cmyk

## संपादकीय

### मतदार यादीतील घोळ आघाडीसाठी धोकादायकच

देशाच्या अन्य भागात मतदार यादीमध्ये जसा घोळ झाला तसाच घोळ महाराष्ट्राच्या बाबतीतही झाला आहे, एकाच घराच्या पत्त्यावर असंख्य मतदारांची नावे नोंदवली गेली आहेत. दुबार मतदार नाव नोंदणीचा प्रकारही सर्रास घडला आहे. नाव आणि पत्त्यांचाही घोळ आहे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१८१ | बुधवार, दि.२९ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### छठ पूजनानंतर लाकडी नाव पलटली

चंद्रपूर: छठ पूजनानंतर वर्धा नदी घाटावर मंगळवारी सकाळी एक मोठा अपघात टळला. पूजन आटोपल्यानंतर श्रद्धाळूंनी भरलेली एक लाकडी नाव अचानक उलटली, मात्र स्थानिकांच्या तत्परतेने दहा जणांचा जीव वाचवण्यात यश आले. दोन लहान मुले बेशुद्ध अवस्थेत सापडली होती, त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून डॉक्टरांनी त्यांना धोका टळल्याचे सांगितले आहे. मंगळवारी सकाळी सुमारे आठ वाजताच्या सुमारास बल्लारपूर–राजुरा मार्गावरील वर्धा नदी घाटावर छठ महापर्वाच्या दुसऱ्या दिवशी महिलांनी पाण्यात उभे छठ पुजा केली. पूजा संपल्यावर काही श्रद्धाळूंनी नाव द्वारे नौकाविहारास सुरुवात केली. त्याचवेळी संतुलन बिघडल्याने नाव डळमळली आणि पाण्यात उलटली. नावेमध्ये सुमारे १० जण बसले होते, हे सर्वजण बल्लारपूरच्या दीनदयाळ वॉर्ड व राजुराच्या चुनाला येथील यादव कुटुंबातील सदस्य असल्याचे समजते.

### बँकातील गुंतवणूकीची मर्यादा वाढविली

दिल्ली: अर्थ मंत्रालयाने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये ४९% पर्यंत थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी देण्याचा प्रस्ताव मांडला आहे आणि या योजनेवर रिझर्व्ह बँकेचे मत मागितले आहे, असे एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर वृत्तसंस्थेला सांगितले. सध्या, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये परकीय गुंतवणुकीची मर्यादा २०% पर्यंत आहे, तर खाजगी बँकांमध्ये ७४% पर्यंत परकीय मालकी असू शकते. ''आम्ही यावर काम करत आहोत,'' या अधिकाऱ्याने पुष्टी केली. भारतात १२ सरकारी मालकीच्या बँका आहेत, ज्या मार्चपर्यंत सुमारे १.९५ ट्रिलियन डॉलर्सची मालमत्ता धारण करतात, जी देशाच्या बँकिंग क्षेत्राच्या ५५% आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकार या बँकांमध्ये किमान ५१% हिस्सा राखण्याचा मानस आहे, ज्यामुळे प्रस्ताव मंजूर झाला तरीही बहुसंख्य मालकी सुनिश्चित होईल.

### प्रशांत किशोरांचे नाव दोन राज्यांच्या मतदार यादीत

दिल्ली: दोन राज्यांच्या मतदार यादीत नाव असल्याने जन सुराज पार्टीचे संस्थापक प्रशांत किशोर यांच्या अडचणी वाढल्या आहेत. या प्रकरणी करगहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांना नोटीस पाठवून तीन दिवसांच्या आत स्पष्टीकरण देण्यास सांगितले आहे. प्रशांत किशोर यांचे नाव बिहार आणि पश्चिम बंगाल या दोन राज्यांच्या मतदार यादीत असल्याची माहिती समोर आली आहे. करगहर विधानसभा मतदारसंघाचे सासाराम भू–राजस्व उप–जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आली आहे. कायद्याचे उल्लंघन झाल्यास जनप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम ३१ अंतर्गत एक वर्षाचा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे.

### टाटांचे विश्वासू सहकारी मेहली मिस्त्री पायउतार

मुंबई : रतन टाटा यांचे विश्वासू सहकारी अशी ओळख असणारे मेहली मिस्त्री यांना टाटा ट्रस्ट्समधून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. मंगळवारी झालेल्या मतदानात बहुतांश विश्वस्तांनी त्यांच्या पुनर्नियुक्तीच्या विरोधात मतदान केले. त्यांना सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि सर रतन टाटा ट्रस्ट या दोन्ही बोर्डांवरून पायउतार व्हावे लागले. या दोन्ही ट्रस्टचा टाटा सन्समधील हिस्सा तब्बल ६६% आहे. नेहमीच पडद्याआड राहून मोठी भूमिका बजावणारे मेहली मिस्त्री हे टाटा ट्रस्टमधून बाहेर पडणे हे टाटा समूहाच्या इतिहासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# ४० लाख पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात आठ हजार कोटी जमा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात यंदा झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे प्रभावित झालेल्या लाखो शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (२८ ऑक्टोबर) मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले की, आतापर्यंत ४० लाख पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात ८ हजार कोटी रुपयांची मदत जमा करण्यात आली आहे. याशिवाय, आणखी ११ हजार कोटी रुपयांच्या वितरणाला मंजुरी देण्यात आली असून, हे पैसे पुढील १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचवले जाणार आहेत. हे रिलिफ पॅकेज अर्थसंकल्पीय तरतुदीबाहेरील असल्याने विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, जशा याद्या येतील, तशी निधी वितरणाला मान्यता द्यायची आणि संपूर्ण याद्या येईपर्यंत थांबायचे नाही, असा निर्णय आम्ही सुरुवातीपासून घेतला होता. त्यामुळे कुणालाही मनात शंका बाळगण्याचे कारण नाही. ज्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या नुकसानीसाठी पैसे मिळाले आहेत, त्यांच्या खात्यात तिसऱ्या हेक्टरच्या नुकसानीसाठीही पैसे जमा करण्यास सुरुवात झाली आहे. पुढील १५ ते २० दिवसांत सर्व शेतकऱ्यांच्या खात्यात पूर्ण मदत पोहोचेल.आम्ही ९० टक्के शेतक–यांना तातडीने ही मदत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहोत. उर्वरित १० टक्क्यांपैकी काही

▶▶ पान २ वर

### “ २१ हजार कोटींचे वितरण होणार

या रिलिफ पॅकेजबाबत अधिक माहिती देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, हे २१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज थेट शेतक–यांच्या खात्यात जाणार आहे. त्यापैकी ८ हजार कोटी वितरित झाले आहेत. ११ हजार कोटी वितरित करण्यास आज मंजुरी देण्यात आली आहे आणि १ हजार ५०० कोटी रुपये स्वतंत्रपणे वितरित करण्यात येत आहेत. अशाप्रकारे संपूर्ण पॅकेज रिलीज करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

### “ बच्चू कडूंसोबतची बैठक रद्द झाली?


बच्चू कडू यांनी मला मेसेज पाठवला की, आम्ही बैठकीला येणार असल्याचे तुम्हाला सांगितले होते, पण आमचे सगळे शेतकरी नागपूरला जमा होत आहेत आणि आम्हीच तिथे नसलो तर कन्फ्युजन होईल. त्यामुळे आमचे मागणीपत्र तुमच्याकडे पाठवतो आहोत. त्यावर तुम्ही निर्णय घ्या. आम्ही बैठकीला येणार नाही. बच्चू कडूंच्या निरोपानंतर आम्ही बैठक रद्द केली. त्यांच्या मागणीपत्रातील ज्या बाबींवर सकारात्मक निर्णय घेता येतील, ते घेऊ.

## पुढच्या आठवड्यात आचारसंहिता?

### न्यायायलयाच्या आदेशानुसार जानेवारी अखेर पर्यंत घ्यावी लागणार निवडणूक

मुंबई । प्रतिनिधी

**प्रमुख विरोधी पक्षांनी आधी मतदारयाद्या दुरुस्त करा आणि नंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची मागणी केली असली, तरी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात या निवडणुकांचा बिगुल फुंकला जाणार असल्याचे समजते. आधी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषदा व नगरपंचायती यांच्या निवडणुका घेण्याची तयारी राज्य निवडणूक आयोगाने केली असून, यापैकी सर्वप्रथम कोणत्या निवडणुकांचा बार उडतो, याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.**




सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रिया जानेवारी महिन्याच्या अखेरीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी तयारी सुरू केली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी

▶▶ पान २ वर

## रोटी बोटी चपटी आणि लक्ष्मी दर्शनामुळे निवडणुका जिंकलो–आ.प्रकाश सोळुंके

माजलगाव । प्रतिनिधी

निवडणूक लढवणे सोपे नाही मला चांगला अनुभव आहे शेवटच्या दिवसांमध्ये काय काय करावे लागते हे सांगताना माजलगाव मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आ.प्रकाश सोळुंके यांनी चपटी कोंबडे बकरे आणि लक्ष्मी दर्शनामुळे मी आमदार झालो असे जाहीर बोलताना लोकशाहीतील मतदाराची एक प्रकारे थट्टा केली आहे त्यांच्या या विधानाकडे निवडणूक आयोगाने पक्ष कशा पद्धतीने लक्ष देणार याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

माजलगाव मतदारसंघाचे गेली पाच वर्ष प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदार प्रकाश दादा सोळुंके यांचे आजचे वक्तव्य अनेकांना आश्चर्यामध्ये टाकणारे नसले तरी उघड बोलल्यामुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे सध्या दिवाळी पाडव्यानिमित्त स्नेहभोजनाचे आणि गाठी भेटीचे कार्यक्रम सुरू आहेत याच कार्यक्रमांमध्ये बोलताना प्रकाश दादा घसरले म्हणण्यापेक्षा सत्य परिस्थितीवर आले निवडणूक कशी लढवायची आणि कशी जिंकायची हे सूत्र त्यांनी सांगताना मतदार विकला जातो हे त्यांच्या वाक्यातून सिद्ध होत आहे चपटी कोंबडे बोकड द्यावे लागते शेवटच्या क्षणी लक्ष्मी



दर्शन ही करावे लागते अशातून निवडणुका जिंकल्या जातात मी अशाच निवडणुका जिंकल्याचे कबूल करताना त्यांनी मात्र हे काय बोलून गेले अशी चर्चा लोकशाहीत निवडणूक ही मतदारांच्या इच्छेचा आणि विचारांचा सन्मान करणारी प्रक्रिया मानली जाते. मात्र, अशा प्रकारे मतदारांना प्रलोभन देऊन निवडणुका जिंकल्या जात असल्याची उघड कबुली स्वतः आमदाराकडूनच देण्यात येणे, ही लोकशाहीच्या अधःपतनाची चिन्हे आहेत, अशी प्रतिक्रिया विरोधकांकडून व्यक्त होत आहे. निवडणूक

▶▶ पान २ वर

## चऱ्हाट्यातील मस्जिदच्या जागेची बेकायदेशी विक्री



बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे चऱ्हाटा गावात धार्मिक संपत्तीचा अपहार झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. गावातील सार्वजनिक मस्जिद पाडून तिच्या जागेची बेकायदेशीर विक्री केल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला आहे. या प्रकारामुळे मुस्लिम समाजात तीव्र संतापाचे वातावरण असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

ग्रामस्थ शेख युनुस महेबुब यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक,

▶▶ पान २ वर

## महिला डॉक्टर आत्महत्येचे दिल्लीत पडसाद

### युवा काँग्रेसचे आंदोलन, मुख्यमंत्री फडणवीसांचा पुतळा जाळला



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्ली येथे युवा काँग्रेसकडून फलटण प्रकरणाच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन सुरू करण्यात आले असून मृत डॉ. संपदा मुंडे यांना न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी यावेळी कार्यकर्त्यांनी केली आहे. या आंदोलनावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुतळा देखील जाळण्यात आला. यावेळी कार्यकर्ते पोलिसांनी लावलेल्या बॅरिकेड्सवर देखील चढल्याचे पाहायला मिळाले.

▶▶ पान २ वर

## सुषमा अंधारे, आगवणेंवर ५० कोटींचा अब्रुनुकसानीचा दावा

फलटण । प्रतिनिधी

**सुषमा अंधारे व जयश्री आगवणे यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन माजी खासदार रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांच्यावर केलेले आरोप चुकीचे आहेत. याबद्दल त्यांनी ४८ तासांच्या आत माध्यमांसमोर लेखी माफी मागावी, अन्यथा ५० कोटींचा अब्रुनुकसानीचा दावा ठोकला जाईल अशा आशयाची नोटीस अंधारे आणि आगवणे यांना पाठविली आहे, अशी माहिती ॲड. धीरज घाडगे यांनी दिली.**

फलटण येथे पत्रकार परिषदेत ॲड. धीरज घाडगे यांच्यासह ॲड. सचिन शिंदे, ॲड. नरसिंह निकम उपस्थित होते. यावेळी ॲड. घाडगे म्हणाले, 'सुषमा अंधारे यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांनी २७७ एफआयआर दाखल केल्याचा आरोप चुकीचा आहे. उपविभागीय पोलिस अधिका–यांनी दिलेल्या पत्रात फलटण शहर व फलटण ग्रामीण पोलिसांत रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांच्या फिर्यादीवरून ऊस मुकादमाविरोधात तक्रार अथवा गुन्हा दाखल नाही. मुकादमांना उचलून आणणे, मारहाण करून

▶▶ पान २ वर

## आठवा वेतन आयोग प्रक्रियेला सुरूवात; ५० लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांना होणार फायदा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक खुशखबर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने मंगळवारी (दि.२८) आठव्या वेतन आयोगाच्या

▶▶ पान २ वर




## आता रामगिरी बंगल्यावर कूच करणार; बच्चू कडूंचा देवेंद्र फडणवीसांना अल्टिमेटम

नागपूर । प्रतिनिधी

शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावर चर्चा करण्यासाठी सरकारने बोलावलेल्या बैठकीत उपस्थित राहणार नसल्याची माहिती प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी दिली आहे. नंतर रामगिरी बंगल्यावर कूच करणार, असा अल्टिमेटम त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी बच्चू कड यांनी काढलेल्या महाएल्गार ट्रॅक्टर मोर्चाला राज्यभरातील हजारो

▶▶ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ ऑक्टोबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७०.०० क्विंटल | २,३०० | २,८७० | २,५५७ |
| ज्वारी/हायब्रिड: ८६.०० क्विंटल | २,३०० | २,८५० | २,६१५ |
| मका/लोकल: ३०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : १०.०० क्विंटल | ६,९४६ | ६,९४६ | ६,९४६ |
| उडीद : ३.५० क्विंटल | ४,४०१ | ४,९०० | ४,६५० |
| बाजरी: १४३.५० क्विंटल | २,१९१ | २,८९१ | २,६३४ |
| मुग:३.५० क्विंटल | ५,८११ | ५,८११ | ५,८११ |
| सोयाबीन: ११९.०० क्विंटल | ३,९०० | ४,३०६ | ४,२११ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ४,५०० | ५,५५० | ५,०२५ |

## निवडून आल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ

मुंबई । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आल्यानंतर उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय आज (दि. २८) मंत्रिमंडळाने घेतला. त्याचबरोबर राज्याच्या विकासाला दिशा देणाऱ्या विकसित महाराष्ट्र–२०४७ व्हिजन डॉक्युमेंटला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

विकसित महाराष्ट्र २०४७ च्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट (व्हीएमयू) गठीत करण्यात येणार आहे. राज्यातील नागरिकांकडून मते व प्रतिसाद मागवून, त्यांचे एआय–आधारित विश्लेषण करून डॉक्युमेंट तयार करण्यात आले आहे. या डॉक्युमेंटमध्ये राज्य व जिल्हा पातळीवरील १६ संकल्पना निश्चित करण्यात आल्या आहेत. प्रगतीशील, शाश्वत,

▶▶ पान २ वर

# राज्याच्या तिजोरीवर प्रचंड बोजा!

### सरकारकडून एका वर्षात ४३ हजार कोटी रुपयांचा खर्च

मुंबई । प्रतिनिधी

**महायुती सरकारला लाडकी बहीण योजनेचा फायदा निवडणुकीमध्ये प्रचंड झाला. मात्र, आता राज्याच्या तिजोरीवर या योजनेमुळे मोठा ताण येत असल्याचे पुढे येत आहे. त्यामध्ये आता धक्कादायक अशी आकडेवारी पुढे आली आहे.**

ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने राज्यात लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेतून महिलांना प्रत्येक महिन्याला सरकारकडून १५०० रुपये दिले जातात. विशेष म्हणजे या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या महिलांची संख्या अत्यंत जास्त आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीला या योजनेचा प्रचंड असा फायदा झाला आणि थेट सत्तेवर यायची संधी मिळाली. मात्र. या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा परिणाम झाला असून खर्च वाढला आहे. लाडक्या बहिणींसाठी राज्य सरकारकडून एका वर्षात ४३ हजार कोटी रुपयांचा खर्च करण्यात आल्याची मोठी माहिती नुकतीच माहिती अधिकारातून उघड झाली. या योजनेसाठी इतर विभागाच्या निधीचा वापर केला जात असल्याचा



सातत्याने आरोप केला जात आहे. आरटीआय कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांनी लाडकी बहीण योजनेच्या खर्चाची आकडेवारी समोर आणली. जुलै २०२४ ते जून २०२५ या काळात ४३ हजार ०४५.०६ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आल्याचे आरटीआयमधून समोर आले आहे. सरकारकडून काही नियमांत या योजनेत बदल करण्यात आल्याने लाभार्थी महिलांच्या संख्येत घट झाली. सरकारने २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी या योजनेसाठी ३६,०००कोटी रुपयांचा निधी वाटप केला आहे. पहिल्या वर्षी सरासरी मासिक खर्च ३,५८७ कोटी होता. त्यामुळे, जर निकषांनुसार लाभार्थ्यांची संख्या

▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# आनंदोत्सवातील प्रदूषण !

सध्या देशात दिवाळीची धामधूम आहे. या आनंदोत्सवाच्या सणात सर्वसामान्य माणूस होऊ दे खर्च, असे म्हणत स्वतःचं दिवाळं काढून घेत असतो. सोन्याच्या भावाने हिमालय गाठला तरी गुंजभर का होईना सोने खरेदी करण्यासाठी तो धडपडत असतो. धामधूमीच्या नावाखाली वाहन, सोने-चांदी, कपडे, मोबाईल खरेदी मोठ्या उत्साहात केली जाते. दिवाळी म्हटले की फटाके आलेच. दिवाळी आणि फटाके हे समीकरण असे काही रूढ झाले आहे की, या फटाक्यांच्या धुरामुळे होणारे दुष्परिणाम कोणाच्या लक्षातच येत नाहीत. आले तरी त्याकडे पद्धतशीरपणे दुर्लक्ष केले जाते अर्थात फटाक्यांचे आकर्षण लहान मुलांनाच अधिक असते. मुले मोठी झाली की फटाके फोडण्याचा उत्साह तितकासा राहत नाही. मुळात, फटाक्यांमध्ये आनंद शोधायचा का? असा विचार करायची वेळ आली आहे. फटाक्यांचा मोठा आवाज जे फटाके फोडतात त्यांनाही सहन होत नाही. फटाक्याची वात पेटवून ही मंडळी आपले कान बंद करून दूर उभी राहते. म्हणजेच तुम्हालाच जर आवाज सहन होत नाही तर तो इतरांना कसा काय सहन होईल?

याचा अर्थ आनंदाच्या संकल्पनेतून फटाक्यांना हद्दपार करा, फटाके फोडूच नका असा नाही. फटाके असे उडवा ज्याचा डोळ्यांना व मनाला आनंद घेता येईल, ज्यामुळे प्रदूषणही कमी होईल. यासाठी हरित फटाके हा उत्तम पर्याय आहे. फटाके फोडण्याला हरकत नाही; पण ते हरित फटाके असावेत, मोठ्या आवाजाचे नसावेत. फटाक्यांचा मोठा आवाज व धूर सहन होत नाही. आजारी व्यक्ती, ज्येष्ठ मंडळी, तान्ही मुले यांना मोठा आवाज सहन होत नाही. दिवाळीत फटाके फोडल्यामुळे कार्बन मोनाक्साईड, हायड्रोकार्बन्स, सल्फरडाय ऑक्साइड इत्यादींचे हवेतले प्रमाण प्रचंड वाढते. त्याचा परिणाम गरोदर स्त्रिया, लहान मुले आणि अस्थमाचे रुग्ण यांच्यावर सर्वाधिक होतो. या घातक वायूंची हवेतील पातळी वाढल्यामुळे घसा, नाक आणि डोळ्यांना त्रास होतो, मेंदूच्या क्षमतेवर परिणाम होतो. ज्या लोकांना हृदयरोग, श्वसनाचे विकार आणि मज्जासंस्थेचे विकार असतात, सर्दी, खोकला आणि ॲलर्जी असणाऱ्या लोकांना मोठ्या प्रमाणावर होतो. फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाबरोबरच मोठ्या आवाजामुळे होणारे ध्वनी प्रदूषणही मोठे आहे. केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाने दिलेल्या माहितीनुसार आवाजाच्या पातळीसाठी दिवसा ६० डेसिबल आणि रात्री ५० डेसिबल अशी मर्यादा आखून दिलेली आहे. फटाक्यांमुळे ही मर्यादा १४० डेसिबल्सपर्यंत जाते. ८५ डेसिबल्सपेक्षा जास्त आवाजामुळे ऐकायला त्रास होतो. आवाज वाढल्यामुळे अस्वस्थता, तात्पुरता किंवा कायमचा बहिरेपणा, उच्च रक्तदाब आणि अस्वस्थ झोप यासारख्या समस्या उद्भवू शकतात. शहरात फटाके फोडण्यामुळे होणारे ध्वनी प्रदूषण आणि हवा प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे. देशाची राजधानी दिल्लीमध्ये दरवर्षी दिवाळीत हवेचा दर्जा कमालीचा खालावतो. यंदाही तेथील हवेची गुणवत्ता घसरली असून प्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. हवा गुणवत्ता निर्देशांक ४०० च्या वर पोहोचला आहे. प्रदूषण रोखण्यासाठी १२ कलमी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यात रस्त्यांची स्वच्छता, धूळ नियंत्रण, बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पाहणी, हॉटस्पॉट क्षेत्रांवर कारवाई, अखंडित वीजपुरवठा, वाहतूक नियंत्रण, जनजागृती मोहीम, खासगी वाहनांचा कमी वापर, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर भर आदींचा समावेश आहे. दिवाळीचा प्रकाश आणि रंग घराघरात आनंद घेऊन येतो; पण या आनंदाबरोबरच वाढणाऱ्या हवेतील प्रदूषणाविरुद्ध खबरदारी घ्यावी लागते. फटाक्यांच्या धुरातून, रसायनांमधून आणि सूक्ष्म धुळीतून निर्माण होणारे घटक त्वचा, डोळे आणि श्वसनसंस्थेसाठी हानीकारक ठरू शकतात. फटाके फुटल्यावर त्यातून सूक्ष्म कण आणि जड धातू हवेत पसरतात. त्यासाठी सुरक्षित अंतर आणि डोळ्यासाठी संरक्षणात्मक चष्म्याचा वापर आवश्यक आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदय व फुफ्फुसाचे आजार असलेल्या रुग्णांना प्रदूषण आणि दिनक्रमातील बदलांचा अधिक परिणाम होतो. प्रदूषणामुळे दम्याचे आणि हृदय विकाराचे त्रास वाढू शकतात. दिवसेंदिवस खालावत जाणाऱ्या हवेच्या गुणवत्तेत भर पडते ती फटाक्यांमुळे वाढणाऱ्या प्रदूषणाची, आवाजाची. निर्धारित डेसिबल मर्यादा ओलांडून जाणारा आवाज आणि धुरामुळे काळवंडून जाणारी अशुद्ध हवा भोवतालच्या वातावरणाचा गळा घोटू लागली आहे. आधीच हवेचे तीन-तेरा वाजले आहेत. हवेचा स्तर इतका खालावतो की शाळा, आस्थापने, वाहतूक काही काळ बंद ठेवावी लागतात म्हणून आनंद साजरा करण्यासाठी हरित फटाक्यांसारखे पर्याय शोधायला हवेत. हरित फटाक्यांमध्ये पोटॅशियम नायट्रेट, सल्फर हे घटक नसल्यामुळे ४० टक्के हवा आणि ध्वनी प्रदूषण कमी होते. आता जनतेनेच पारंपरिक फटाक्यांचे होणारे दुष्परिणाम ओळखून त्यांचा वापर करणे टाळले तरच प्रदूषणाला आळा बसेल. फटाक्यांची निर्मितीच कमी झाली तर दरवर्षी कारखान्यात होणाऱ्या स्फोटांचे प्रमाणही कमी होईल, जीवितहानी टाळता येईल. दिवाळी हा दिव्यांचा उत्सव. दिवाळीतील अमावस्येचा अंधार कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांनी दूर होत नाहीच, उलट डोळ्यांसमोर काजवे चमकून सर्वत्र अंधार झाल्याचाच भास होतो. जगातील सर्वात प्रदुषित शहरांपैकी जवळपास निम्मी शहरे भारतात आहेत. राजधानी दिल्लीचा जगातील सर्वात प्रदुषित शहरांमध्ये समावेश होतो, हे नक्कीच भूषणावह नाही. दिवाळीसारख्या सणांमध्ये फटाके उडवायची परंपरा ही आनंददायी क्रिया म्हणून पाहिली जाते मात्र फटाक्यांचे मानवी आरोग्यावर व पर्यावरणावर होणारे हानिकारक परिणाम ओळखणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण केवळ उत्सवापुरते मर्यादित न राहता, वर्षभर जागरूकता निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. फटाक्यांना परवानगी देण्याबरोबरच, प्रदूषण रोखणे आणि कचरा व्यवस्थापन यासारख्या प्रदूषणविरोधी उपायांचा विचार करणेही आवश्यक आहे.

## बीड जिल्ह्यात ३० ऑक्टोबरदरम्यान विजांसह जोरदार पावसाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

**पुढील काही दिवस जिल्ह्यात पावसाचा जोर वाढणार असून २४ ऑक्टोबरपासून पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे . ३० ऑक्टोबरदरम्यान बीड , पाटोदा , माजलगाव , अंबाजोगाई , धारूर , गेवराई , परळी , माजलगाव परिसरात विजा व मेघगर्जनेसह मध्यम ते जोरदार तसेच स्थानिक पातळीवर मुसळधार पावसाचा अंदाज आहे.**

बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रात तयार झालेल्या दोन कमी दाबाच्या प्रणालीमुळे राज्यात ट्रफ लाईन तयार होत असून पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे . १ ते ४ नोव्हेंबरदरम्यानही विखुरलेल्या स्वरूपातील पावसाचा अंदाज असून ५ नोव्हेंबरपासून पावसाचा प्रभाव हळूहळू कमी होणार आहे .या पावसामुळे शेतकऱ्यांनी विशेष दक्षता घेणे अत्यावश्यक असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले . कापूस , सोयाबीन , ज्वारी अशा काढणी आलेल्या पिकांचे उत्पादन सुरक्षित साठवून ठेवावे , धान्य तसेच कापूस ओल्या ठिकाणी ठेवू नये आणि जनावरांची शेड सुरक्षित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. विजांचा कडकडाट झाल्यास शेतात काम करण्यापासून दूर राहावे तसेच टॉवर , झाडे किंवा लोखंडी वस्तू जवळ उभे राहणे धोकादायक असल्याचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नमूद केले आहे . नाले - ओढ्यांमध्ये अचानक पाणी वाढण्याची शक्यता असल्याने वाहतुकीदरम्यान खबरदारी घ्यावी आणि शाळा , अंगणवाड्या व आपत्कालीन यंत्रणा सतर्क ठेवाव्यात असे उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी आवाहन केले आहे. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी गावस्तरावर आपत्कालीन पथके २४ ७ सज्ज असल्याचे म्हटले आहे . जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे यांनी धोकादायक इमारती , पुरग्रस्त किंवा भूस्खलन प्रवण भागात जाणे टाळण्याचे आणि कोणत्याही आपत्तीत जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान पावसामुळे पिकांवर रोग - किडीचा प्रादुर्भाव वाढू शकतो . म्हणून पिकांची नियमित पाहणी करणे , कापूस व सोयाबीनचे वाळवण त्वरीत करणे , ज्वारी व हरभऱ्यात पाणी साचू न देणे , जनावरांना भिजका चारा न देणे आणि त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक आहे . प्रशासनाने सतत हवामान अपडेट्सवर लक्ष ठेवण्याचे आणि सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे नागरिकांना आवाहन केले असून '' निसर्गासमवेत शहाणपणाने वागून सुरक्षित राहा '' असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# शिरूर येथे महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाचा निषेध

## आरोपीवरती कठोर कारवाई करण्यात यावी

शिरूर । प्रतिनिधी

**सातारा जिल्ह्यातील फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये कार्यरत असलेल्या तरुण महिला डॉक्टरला त्रास देऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणाऱ्या आरोपींची एसआयटी मार्फत चौकशी करून आरोपीवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिरूर येथे मंगळवारी झालेल्या निषेध नोंदणी बैठकीमध्ये करण्यात आली आहे.**



बीड जिल्ह्यातील कोठरबन तरुण महिला डॉक्टर गेल्या काही वर्षापासून फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये आपली प्रामाणिक सेवा बजावत असताना तिला आरोपीकडून मोठा त्रास झाल्याने या त्रासाला कंटाळून या महिला डॉक्टरने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना महाराष्ट्राचे संस्कृतीला कलंक लावणारी आहे. ज्या आरोपीमुळे महिला डॉक्टरला हे टोकाचे पाऊल उचलावे लागले त्या आरोपीची एसआयटी मार्फत चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. यावेळी सरपंच मिथुन डोंगरे, सोमीनाथ विघ्ने, कालिदास आघाव, शेषनारायण खरमाटे, पंजाब आहेर, सुरेश वारे, माजी सभापती बाबुराव केदार, भगवान पाखरे, जयसिंग सिरसाट, सुनील बडे, धोंडीराम बडे, अमोल बडे, दिलीप जायभाये आदींची उपस्थिती होती.

## नवउद्योजक सुग्रीव रसाळ यांचे निधन : मांजरसुंबा परिसरात शोककळा

बीड । प्रतिनिधी



**मांजरसुंबा परिसरातील ओळखले जाणारे नवउद्योजक व राधिका हॉटेल चे मालक सुग्रीव अण्णा रसाळ (वय अंदाजे ४५ वर्षे) यांचे मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी साडेबारा ते एकच्या सुमारास बोबडे हॉस्पिटल, बीड येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.**

सुग्रीव अण्णा रसाळ हे अत्यंत मनमिळावू, मदतीस तत्पर व मेहनती स्वभावाचे म्हणून परिचित होते. त्यांनी काही वर्षांपूर्वी राधिका हॉटेल सुरू करून अल्पावधीतच आपल्या प्रामाणिकपणाने व उत्तम सेवेमुळे ग्राहकांच्या मनात विश्वास निर्माण केला होता. व्यावसायिक क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेली उंच भरारी आणि साधेपणाने जगण्याची त्यांची वृत्ती यामुळे त्यांना समाजात विशेष मान्यता मिळाली होती. अचानक झालेल्या त्यांच्या निधनाची बातमी समजताच परिसरातील नागरिक, व्यापारी वर्ग, तसेच त्यांच्या मित्रपरिवारात शोककळा पसरली. अनेकांनी बोबडे हॉस्पिटल येथे धाव घेत त्यांच्या कुटुंबीयांना धीर दिला. स्व. रसाळ यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, एक मुलगा आणि दोन भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने केवळ कुटुंबाचे नव्हे तर संपूर्ण मांजरसुंबा परिसराचे मोठे नुकसान झाल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. सुग्रीव रसाळ यांच्या आत्म्यास शांती लाभो .

# शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचलीच नाही!

## कॅबिनेट बैठकीत राडा; मुख्यमंत्र्यांची मध्यस्थी

मुंबई । प्रतिनिधी

**अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी सरकारने जाहीर केलेली मदत त्यांच्यापर्यंत खरोखरच पोहोचली आहे की नाही? यावरून मंगळवारी कॅबिनेट बैठकीत मोठा राडा झाला. उद्धव ठाकरे मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या घरी जाऊन सरकारच्या मदतीच्या दाव्यांचा फॅक्ट चेक करणार असतानाच, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नाही असा थेट आरोप प्रशासनावर केला आहे. कॅबिनेटमध्ये मंत्री आणि प्रशासनामध्ये झालेल्या या खडाजंगीत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मध्यस्थी करावी लागली.**

मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देवेंद्र फडणवीस राज्यात अतिवृष्टी आणि महापूर आला त्यासंदर्भातल्या पॅकेजचा आढावा घेतल्याचे सांगितले. आतापर्यंत ८ हजार कोटी रिलीज झाले आहेत. ४० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पोहोचले असून ११ हजार कोटींना मान्यता दिली असल्याचे सांगितले. मात्र, बैठकीदरम्यान सरकारने दिलेली मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहचली नसल्याचा दावा मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी केला. यावेळी प्रशासनाने आमच्याकडून शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहचली असल्याचे सांगितले. यावरून मंत्री आणि प्रशासन यांच्यात खडाजंगी झाली. सरकारकडून देण्यात आलेली मदत तुम्ही पोहचली म्हणता, जिल्हाधिकारी देखील मदत दिली म्हणतात, पण प्रत्यक्षात शेतकरी मदत मिळाली नसल्याचे सांगत असल्याचे पाटील यांनी कॅबिनेट बैठकीत सांगितले. अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्ती करत आता पर्यंत झालेल्या मदतीसंदर्भात आढावा बैठक घ्या आणि किती मदत पोहचली यासंदर्भात माहिती द्या, असे आदेश दिले.

# पान १ वरून...

### ४० लाख पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या

शेतकऱ्यांच्या बँक खात्यात तांत्रिक अडचणी आहेत. काहींच्या रेकॉर्डस्मध्ये समस्या आहेत किंवा काही ठिकाणी मल्टिपल होल्डिंग आहे. या समस्या सोडवण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. आता निधीची कोणतीही कमतरता राहिलेली नाही. फक्त एक गोष्ट समजून घ्यायला हवी की, या प्रक्रियेत दोनवेळा याद्यांची पडताळणी करावी लागते. कारण, पात्र व्यक्ती सुटू नये आणि अपात्र व्यक्तीच्या खात्यात पैसे जाऊ नयेत, यासाठी पुनर्पडताळणी आवश्यक आहे. सुदैवाने आमच्याकडे ॲग्रिस्टॅगचा डेटा उपलब्ध आहे. त्यामुळे नोंद असलेल्या खातेधारकांची ई-केवायसी करावी लागत नाही. अन्यथा या प्रक्रियेलाच एक महिना लागला असता. फक्त ज्या केसेसमध्ये ॲग्रिस्टॅगमध्ये नाव नाही आणि ते मदतीसाठी पात्र आहेत, अशांचेच ई-केवायसी केले जात आहे.

------------

### रोटी बोटी चपटी आणि लक्ष्मी दर्शनामुळ

हा लोकशाहीचा पवित्र सोहळा असताना अशा उघड वक्तव्याने लोकशाहीला अपमानीत केल्याचे मानले जात आहे. मतदारांना खरेदी-विक्रीच्या वस्तूप्रमाणे दाखवणे हा जनतेचा अपमान असून, निवडणूक आयोगाने याची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी जनतेतून होत आहे. जनतेला आकर्षित करण्यासाठी पैशाचा व मद्याचा वापर झाला, अशी कबुली देणाऱ्या आमदारांविरुद्ध निवडणूक आयोग कारवाई करतो का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. अनेक सामाजिक संघटनांनीही या वक्तव्याचा निषेध नोंदवला असून, हा प्रकार लोकशाही व्यवस्थेवर घाला घालणारा आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. मतदारांना दारू, पैशाने विकत घेणं म्हणजे त्यांच्या स्वाभिमानाचा अपमान आहे. हा प्रकार संविधान, निवडणूक आचारसंहिता व लोकशाही मूल्यांना तिलांजली देणारा आहे. लोकशाहीची पायाभरणी करणाऱ्या मतदान प्रक्रियेला काळा डाग लागल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांमधुन व्यक्त केली जात आहे. आगामी नगरपालिका, जि.प.प.स. निवडणुकीसंदर्भात आढवा बैठक घेण्यात आली. या बैठकीला गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित देखील उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गादर्शन करतांना आ.प्रकाश सोळंके बोलत होते अनेक जन निवणुक लढवण्यासाठी ईच्छुक आहेत त्यावर बोलतांना निवडणुक सोपी नाही त्यासाठी बरच काही करावे लागते मला त्याचा अनुभव आहे. आणि त्यांनी लक्ष्मीदर्शन, कोंबड, बकर, याचा उल्लख केला.

-----------

### पुढच्या आठवड्यात

गट आणि गण रचना, आरक्षण जाहीर केले आहे. नगरपरिषद आणि नगरपंचायतींसाठीही नगराध्यक्ष आरक्षण, प्रभाग रचना, तसेच प्रभागनिहाय आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. महापालिकांसाठी प्रभाग रचना तयार केली असली, तरी अजूनही आरक्षण जाहीर करणे बाकी आहे. उपलब्ध माहितीनुसार, प्रथम जिल्हा परिषद, पंचायत समिती, तसेच नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेतल्या जाणार आहेत. त्यातही नगरपरिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका आधी होण्याची शक्यता आहे. त्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक घेतली जाईल, अशी चर्चा आहे, हा क्रम बदलूही शकतो. सर्वात शेवटी महापालिका निवडणुकांचा रणसंग्राम होईल, अशीही शक्यता आहे.

------------

### सुषमा अंधारे, आगवणेंवर ५०

पोलिसांच्या ताब्यात देणे, अटकेनंतर अनफिट असतानाही फिटनेस सर्टिफिकेटसाठी स्थानिक डॉक्टरवर दबाव आणणे, त्यात आत्महत्या केलेल्या महिला डॉक्टरचा समावेश असणे असा एकही प्रसंग घडला नाही.

------------

### महिला डॉक्टर आत्महत्येचे

तसेच देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. फलटण येथील डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येच्या घटनेनंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देखील ट्विट करत निषेध नोंदवला होता. साताऱ्यातील घटना कोणत्याही सुसंस्कृत समाजाच्या विवेकाला हादरवून टाकणारी असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले होते. इतरांचे दुःख कमी करण्याची आकांक्षा बाळगणारी एक होतकरु डॉक्टर भ्रष्ट व्यवस्थेतील गुन्हेगारांच्या छळाचा बळी ठरली. गुन्हेगारांपासून जनतेचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर सोपवण्यात आली, त्यांनीच हा सर्वात घृणास्पद गुन्हा केला असे ते म्हणाले होते. भाजपशी संबंधित काही प्रभावशाली लोकांनी तिच्यावर भ्रष्टाचार करण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्नही केला. संरक्षित गुन्हेगारी विचारसरणीचे हे सर्वात घृणास्पद उदाहरण आहे. ही आत्महत्या नसून संस्थात्मक हत्या आहे. जेव्हा सत्ता गुन्हेगारांना संरक्षण देते, तेव्हा न्यायाची अपेक्षा कोण करू शकते? असा सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला. डॉक्टरच्या मृत्यूने भाजप सरकारचा अमानवी आणि निर्दयी स्वभाव उघडकीस आणला आहे. न्यायाच्या या लढाईत आम्ही पीडितेच्या कुटुंबासोबत खंबीरपणे उभे आहोत. भारताच्या प्रत्येक मुलीसाठी आता भीती नाही, आम्हाला न्याय हवा आहे अशी मागणीही राहुल गांधी यांनी केली.

----------

### आता रामगिरी बंगल्यावर कूच करणार;

शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला आहे. पत्रकार परिषद घेत ते म्हणाले की, घराघरातून प्रत्येक शेतकरी जात, पात, पंथ, पक्ष बाजूला ठेवून येणार आहे. काल मुख्यमंत्री साहेबांशी मेसेजद्वारे चर्चा झाली आहे. त्यांना आम्ही सांगितले की, आज आम्ही येऊ शकत नाही. एक ते दीड लाख लोक नागपूरकडे येणार आहेत. आम्ही जर तिकडे गेलो तर इथले नेतृत्व कोण करणार, असे म्हणत त्यांनी राज्य सरकारने बोलावलेल्या बैठकीला उपस्थित राहणार नसल्याची माहिती दिली. आम्ही आमचे मुद्दे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठवले आहे. हीच योग्य वेळ आहे. मुख्यमंत्र्यांना आम्ही विनंती करतो की, याशिवाय दुसरी कुठलीही योग्य वेळ नाही. त्यांनी चार ते पाच वाजेपर्यंत निर्णय घेतला पाहिजे. आम्ही त्यांची वाट पाहत आहोत. नंतर रामगिरी बंगल्यावर कूच करणार आहोत, असा इशारा त्यांनी दिला आहे. निर्णयाशिवाय आम्ही मागे हटणार नाही. लेखी स्वरूपाचे निर्णय घ्यावेत. काही ठिकाणी शासन निर्णय काढावे लागतील. काही ठिकाणी परिपत्रक काढावे लागतील, ते काढावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. आम्ही रायगडपासून उपोषण सुरू केले तेव्हापासून ही लढाई सुरू आहे. आज शेतकरी प्रचंड अडचणीत आहे. त्यामुळे निर्णय घेणे फार महत्त्वाचे आहे.

------------

### आठवा वेतन आयोग प्रक्रियेला सुरूवात

टर्म्स ऑफ रेफरन्सला मंजुरी दिली. आठव्या केंद्रीय वेतन आयोगाचा लाभ सुमारे ५० लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि ६९ लाख पेन्शनधारकांना होईल. सरकारने जानेवारी २०२५ मध्ये कर्मचाऱ्यांचे वेतन आणि त्यांना मिळणाऱ्या लाभांचा आढावा घेण्यासाठी ८ व्या वेतन आयोगाची स्थापना करण्याची घोषणा केली होती. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, आठवा केंद्रीय वेतन आयोग एक तात्पुरती संस्था म्हणून काम पाहील. या आयोगात एक अध्यक्ष, एक अर्धवेळ सदस्य आणि एक सदस्य सचिव यांचा समावेश असेल. हा आयोग स्थापन झाल्यापासून १८ महिन्यांच्या आत त्यांच्या शिफारशी सादर करेल. विशिष्ट शिफारसींवर शिक्कामोर्तब झाल्यानंतर अंतिम अहवाल सादर केला जाण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांच्या नेतृत्वाखालील आठवा वेतन आयोग केंद्र सरकारला प्राथमिक अहवाल सादर करेल. आयआयएम बंगळुरूचे प्राध्यापक पुलक घोष यांची आयोगाचे अर्धवेळ आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे, तर पेट्रोलियम विभागाचे सचिव पंकज जैन सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी कधी लागू होतील? याबद्दल विचारले असता, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, अंतरिम अहवाल आल्यानंतर त्याची तारीख निश्चित केली जाईल. पण, बहुधा याची तारीख १ जानेवारी २०२६ असेल.

**१ जानेवारीपासून २०२६ पासून लागू होणे अपेक्षित**

केंद्रीय वेतन आयोगांची स्थापना वेळोवेळी केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार, भत्ते, निवृत्तीवेतन आणि इतर सेवा अटींशी संबंधित विविध बाबींचा आढावा घेऊन त्यामध्ये आवश्यक बदलांबाबत शिफारसी करण्यासाठी केली जाते. सामान्यपणे, वेतन आयोगांने केलेल्या शिफारशी दर दहा वर्षांच्या अंतराने लागू केल्या जातात. यानुसार आठव्या केंद्रीय वेतन आयोग १ जानेवारीपासून २०२६ पासून लागू होणे अपेक्षित आहे.

------------

### राज्याच्या तिजोरीवर

आणखी कमी केली नाही, तर सरकारी तिजोरीवर दबाव वाढण्याची शक्यता आहे. मुळात म्हणजे राज्याचे अर्थमंत्री अजित पवार अनेकदा बोलताना दिसले आहेत की, सर्व गोष्टींचे सोंग करता येते पैशांचे नाही. राज्याचे उत्पन्न आहे तेवढेच आहे. मात्र, लाडकी बहीण योजनेमुळे खर्च चांगलाच वाढला आहे. माहिती अधिकारानुसार, लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून ४३,०४५,०६ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. जुलै महिन्यापासून अर्ज दाखल करताना लाभार्थ्यांची संख्या वाढली आणि एप्रिल २०२५ पर्यंत सर्वाधिक लाभार्थी म्हणजेच २,४७,९९,७९७ महिला होत्या. त्यानंतर पुढील काही महिन्यांत सरकारने महिलांना दाखल केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर महिलांच्या संख्येत मोठी घट झाली. लाडकी बहीण योजनेत सरकारी तिजोरीमधून मोठा पैसा जात असल्याचे या आकडेवारीवरून आता स्पष्ट होताना दिसत आहे.

------------

### निवडून आल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्र

सर्वसमावेशक आणि सुशासन या अंतर्गत १०० उपक्रम निश्चित करण्यात आले आहेत. नगरविकास विभाग आणि ग्रामविकास विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, महापालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरींसाठी तसेच ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून येणाऱ्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ मिळणार आहे. यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तर ग्रामविकास विभागासाठी महाराष्ट्र जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत देणे, अध्यादेश २०२५ काढण्यास मान्यता देण्यात आली आहे.

-----------

### चऱ्हाट्यातील मस्जिदच्या

बीड यांच्याकडे दिलेल्या लिखित निवेदनात म्हटले आहे की, मौजे चऱ्हाटा येथील मिळकत क्रमांक ३४१ ही जागा ग्रामपंचायत रेकॉर्डमध्ये 'सहन नामा' म्हणून नोंदवलेली होती. त्या ठिकाणी वर्षानुवर्षे सार्वजनिक मस्जिद अस्तित्वात होती, जी स्थानिक मुस्लिम समाज उपासनेसाठी वापरत होता. मात्र, ग्रामसेवक आणि शेख शब्बीर यांनी संगनमत करून त्या मस्जिदीचे बेकायदेशीर पाडकाम केले आणि सुमारे तीस हजार रुपयांत ती जागा एका खाजगी व्यक्तीस विकल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या कृतीमुळे केवळ धार्मिक भावना दुखावल्या नसून ग्रामपंचायत रजिस्टर व सरकारी अभिलेखांचा गंभीर गैरवापर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. संपूर्ण व्यवहार अनैतिक, बेकायदेशीर आणि प्रशासनाच्या अधिकारांचा दुरुपयोग करणारा असल्याचे निवेदनात नमूद आहे. या प्रकरणावर महसूल, पोलीस व ग्रामपंचायत विभागांनी संयुक्त चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कलम २९५, २९५(), ४२०, ४०६, ४०९ आणि १२०() अन्वये गुन्हे दाखल करावेत आणि प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी समाजातर्फे करण्यात आली आहे. गावातील ज्येष्ठ नागरिकांनी सांगितले की, ''मस्जिद ही गावाच्या धार्मिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग होती. तिचे पाडकाम हा केवळ धार्मिक अपमान नसून सार्वजनिक संपत्तीवर डाका घालण्यासारखा प्रकार आहे.'' या घटनेमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास मोठे जनआंदोलन उभे राहू शकते, असा इशारा समाज नेत्यांनी दिला आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. २९ ऑक्टोबर २०२५


## नागरिकांनी ई-कचरा संकलन अभियानात सहभाग नोंदवावा-जिल्हाधिकारी मित्तल

जालना । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालय व नेचर इको बिल्डींग प्रायव्हेट लिमिटेड या केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ नोंदणीकृत संस्थेच्या सहकार्याने जिल्हास्तरीय ई-कचरा संकलन अभियान दि.२८ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्याकडे असलेला ई-कचरा जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्य सभागृहात जमा करुन या अभियानात सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.



भारतामध्ये दरवर्षी १.६ दशलक्ष टनापेक्षा अधिक ई-कचरा निर्माण होतो या कचऱ्यापैकी बऱ्याच कचऱ्याची विल्हेवाट ही अनाधिकृत मार्गाने केल्याने त्याचे गंभीर परिणाम पर्यावरणावर होताना दिसून येत आहेत. जिल्हातील नागरिकांना ई-कचऱ्याचा वैज्ञानिक व पर्यावरणपुरक निपटारा करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी दि.२८ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत भारत सरकारच्या खाण मंत्रालय व जवाहरलाल नेहरुन ॲल्युमिनीयम रिसर्च डेव्हलपमेंट ॲण्ड डिझाईन सेंटरच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छतोत्सव अभियानांतर्गत नेचर इको बिल्डींग प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयात ई-कचरा संकलन अभियान आयोजित करण्यात आले आहे. सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाच्या कार्यालयातील आपल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या घरातील वापरात नसलेले संगणक, प्रिंटर, मॉनिटर, मोबाईल, बॅटरी, युपीएस, फॅक्स मशिन, स्कॅनर आदि ई-कचऱ्याचे वर्गीकरण करुन जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्य सभागृहात संकलन करावे. ई-कचरा संकलन करतेवेळी मुल्य प्रति युनिट/किलो प्रमाणे दिले जाणार आहे. ई-कचरा संकलन अभियानाचा उद्देश कार्यालयामधून तसेच घरगुती स्तरावर निर्माण होणारा ई-कचरा सुरक्षित आणि पर्यावरणपुरक पध्दतीने संकलित करुन त्याचा योग्य निपटारा करणे हा आहे. ई-कचरा उघड्यावर फेकणे, जाळणे किंवा तोडफोड केल्याने त्यातील शिसे, पारा, कॅडमियम इत्यादी विषारी घटक माती, हवा आणि भुजलात मिसळून प्रदुषण निर्माण करतात व सार्वजनिक आरोग्यावर दुष्परिणाम करतात. नोंदणीकृत पुनर्वापरकर्त्याकडे ई-कचरा सुपूर्द केल्यास प्रदुषण रोखता येते तसेच पुनर्वापर योग्य धातू व घटक सुरक्षितरित्या पुर्नप्राप्त करता येतात. अशी माहितीही त्यांन यावेळी दिली.

## महायुतीचा धर्म पाळणे हीच शिवसेनेची प्राथमिकता : अशोक पटवर्धन

बीड । प्रतिनिधी

येऊ घातलेल्या नगर पालिका निवडणुकीत शिवसेना महायुतीच्या धर्माचे काटेकोर पालन करणार असून, महायुतीतील एकसंघतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवणे हीच आमची प्राथमिकता असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी केले. तर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष शिस्त मोडणाऱ्यांवर कुणाचीही गय केली जाणार नाही, अशा कठोर शब्दांत इशारा जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांनी दिला.

नगर पालिका निवडणुकीच्या अनुषंगाने अंबाजोगाई येथील शासकीय विश्रामगृहात शिवसेनेची आढावा बैठक रविवारी (दि.२६) पार पडली. बैठकीस मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, जिल्हा प्रमुख अनिल जगताप, जिल्हा प्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, चंद्रकांत नवले,



### पक्षशिस्त भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई : बापूसाहेब मोरे

जिल्हा संघटक योगेश नवले, युवा सेना जिल्हाप्रमुख रवी बडे, ऋषिकेश लोमटे यांच्यासह तालुका व शहर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत आगामी नगर पालिका निवडणुकीत महायुती घटक पक्षांमधील समन्वय, प्रचाराची दिशा, मतदारसंघनिहाय ताकद आणि संघटनात्मक कामकाज यावर सविस्तर चर्चा झाली. पटवर्धन म्हणाले, शिवसेना ही कार्यकर्त्यांच्या ताकदीवर उभी असलेली संघटना आहे. जनतेचा विश्वास संपादन करणे, विकासाची कामे प्राधान्याने राबवणे आणि पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली संघटनेची घडी मजबूत करणे हेच आमचे ध्येय आहे. या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना पाठबळ देत, शिवसेना संघटन मजबूत करण्यावर भर दिला जाणार असल्याचे पटवर्धन यांनी सांगितले.

बापूसाहेब मोरे म्हणाले, पक्ष हा एक कुटुंब आहे. कोणताही कार्यकर्ता किंवा पदाधिकारी शिस्त मोडणार नाही याची जबाबदारी प्रत्येकाने घेतली पाहिजे. शिस्तभंग करणाऱ्यांवर कारवाई अपरिहार्य आहे. आगामी निवडणुकीत शिवसेनेची एकजूट आणि कार्यकर्त्यांची जिद्द नक्कीच विजय मिळवून देईल. बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांनी आपल्या मतदारसंघातील स्थिती मांडत, पक्षाच्या विजयासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी कामगार सेना जिल्हा प्रमुख रवि मुडेगावकर, उप जिल्हा प्रमुख राजेभाऊ लोमटे, तालुका प्रमुख अर्जुन वाघमारे, शहर प्रमुख गणेश जाधव ,जिला सहसंघट गजानन मुडेगावकर ,तालुका संघटक महादेव चाटे ,उप तालुका प्रमुख गणेश देवकते ,दशरथ चाटे, नाना देवकर ,अनिल जोगदंड, माऊली पतंगे, हानुमंत हावळे, महिला आघाडी ईतर शिवसैनिक खुप मोठ्या संखेने उपस्थित होते.

## नव्या बीडीओंसमोर शिस्त आणि पारदर्शकतेचे मोठे आव्हान

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पंचायत समितीत गेल्या काही महिन्यांपासून प्रशासनातील भ्रष्टाचार, कामचुकारपणा आणि गैरव्यवहारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. भ्रष्ट यंत्रणेला वैतागून मागील एका वर्षात तब्बल तीन बीडीओ बदलून गेले, परंतु स्थिती पूर्वीप्रमाणेच कायम आहे. अशा पार्श्वभूमीवर नुकतेच कार्यभार स्वीकारलेले नवीन बीडीओ सानप साहेब यांच्याकडून आता सर्वसामान्य जनतेत मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.





स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, शासकीय वेळेत अनेक कर्मचारी कार्यालयात उपस्थित नसतात, तर काहीजण आपली कामे करण्यासाठी अनावश्यक विलंब करतात. विशेषतः इंजिनियर विभागात दामाशिवाय काम नाही अशी प्रथा जणू सर्वमान्य झाली आहे. ग्रामविकासाच्या योजनांपासून ते रस्त्यांच्या कामांपर्यंत सर्व ठिकाणी भ्रष्टाचाराचे सावट असल्याचे चित्र दिसून येते.अनेक वेळा नागरिकांनी पंचायत समितीकडे तक्रारी केल्या, परंतु अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे आता लोकांच्या नजरा नवीन बीडीओ सानप साहेबांकडे वळल्या आहेत. त्यांच्याकडून कामचुकार कर्मचाऱ्यांना शिस्त लावणे, भ्रष्ट यंत्रणेला लगाम घालणे आणि पारदर्शक प्रशासन उभे करणे याची अपेक्षा आहे.स्थानिक कार्यकर्त्यांच्या मते, दरवर्षी अधिकारी बदलतात पण परिस्थिती बदलत नाही. आता सानप साहेबांनी जर खरंच कठोर पावले उचलली, तर प्रशासनावर जनतेचा विश्वास पुन्हा प्रस्थापित होऊ शकेल.पाटोदा पंचायत समिती ही तालुक्याच्या विकासाचे केंद्र असून, जर इथल्या यंत्रणेत पारदर्शकता आली, तर संपूर्ण तालुक्याच्या विकासाला गती मिळू शकेल. सानप साहेबांसमोर भ्रष्टाचारमुक्त,जबाबदार आणि शिस्तबद्ध पंचायत समिती उभारण्याचं मोठं आव्हान आहे. पुढील काही आठवड्यांत त्यांच्या कारवाईवरूनच हे स्पष्ट होईल की, या बदलाची नवी सुरुवात खरोखर होते की पुन्हा एकदा फक्त अधिकारी बदलून परिस्थिती जसंच्या तसं राहणार आहे.

## अहंकार निर्मूलनासाठी आई प्रत्येक युगात अवतार घेते -साध्वी आदिती भारतीजी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अहंकाराचा नाश करण्यासाठी आणि अधर्माचा पराभव करण्यासाठी माता प्रत्येक युगात अवतार घेते. मनुष्याचा सर्वात मोठा शत्रू अहंकारच आहे. त्याचा त्याग केला, तरच जीवनात खरा परिवर्तन घडू शकतो, असे प्रतिपादन दिव्य ज्योती जागृती संस्थानचे संस्थापक परमपूज्य सद्गुरु श्री आशुतोष जी महाराज यांच्या कृपा पात्र शिष्या साध्वी आदिती भारतीजी यांनी केले.

शहरातील दिव्य ज्योती जागृती संस्थेद्वारे आयोजित सप्त दिवसीय श्रीमद्? देवी भागवत ज्ञानयज्ञ कथा भक्तीपूर्ण वातावरणात सुरु आहे. कथेच्या चौथ्या दिवशी साध्वीजींनी देवी महामायाच्या विविध रूपांचे सामर्थ्य सांगत मानव जीवनातील अध्यात्मिक, सामाजिक आणि नैतिक मूल्यांचे महत्व अधोरेखित केले. त्यांनी पुढे म्हटले की, क्रोध, लोभ, मत्सर आणि वासना यांमुळे मनुष्य पशुत्वाकडे झुकतो. या विकारांवर



नियंत्रण ठेवून सद्गुरूंच्या मार्गदर्शनाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. आत्मपरिवर्तनातूनच विश्वपरिवर्तन शक्य आहे. यावेळी माता काली, माता सरस्वती आणि माता लक्ष्मी यांच्या विविध प्रसंगांचे वर्णन करत त्यांनी धर्मसंस्थापनेतील मातृशक्तीचे महत्व विशद केले. राम-सीतेच्या आदर्श जीवनाचा दाखला देत गुरू-शिष्य परंपरेतून धर्माची परंपरा आजही जिवंत आहे असे साध्वी आदिती भारतीजी यांनी सांगितले.कार्यक्रमादरम्यान भक्तांनी भक्तिगीत, नामस्मरण आणि स्तोत्र पठणाचा आनंद घेतला. कथास्थळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. कथेच्या चौथ्या दिवशी अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, लोकमतचे पत्रकार अविनाश मुडेगावकर, पंचफुला शाहू बिडवे यांच्यासह भाविकांनी कथेला उपस्थिती लावली आणि माता सरस्वतीचे आशीर्वाद प्राप्त केले.

भाविकांची अलोट उपस्थिती

अंबाजोगाईसह परळी, सोनपेठ, गंगाखेड, नांदेड, सिरसाळा, माजलगाव, लातूर, कळंब, केज आदी ठिकाणांहून भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमाला भव्यता प्राप्त झाली.

## छत्रपती साखर कारखान्याच्या बाराव्या गळीत हंगामास सुरुवात

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील छत्रपती सहकारी साखर कारखाना लि., सोनाजीनगर याचा २०२५-२६ चा बाराव्या गळीत हंगामाचा शुभारंभ मंगळवारी कारखान्याचे चेअरमन मा. आ. बाजीराव (भाऊ) जगताप व व्हा. चेअरमन मोहनराव जगताप तसेच शेतकऱ्यांच्या शुभहस्ते गव्हाणीत मोळी टाकून पार पडला.



यावेळी बोलताना चेअरमन जगताप म्हणाले की, छत्रपती साखर कारखाना हा नेहमीच शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करणारा कारखाना आहे. इतर कारखान्यांपेक्षा आम्ही ऊसाला अधिकचा दिलेला आहे. यंदा पावसाचे प्रमाण चांगले असल्याने ऊस लागवड खुप मोठ्या प्रमाणात झाली आहे. छत्रपती कारखाना हा एकाही शेतकऱ्याचा ऊस शेतात शिल्लक ठेवणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला ऊस छत्रपती कारखान्याकडेच गाळपासाठी आणावा.

व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी सांगितले की, गेल्या अकरा हंगामांप्रमाणे यंदाही छत्रपती कारखाना शेतकऱ्यांना योग्य भाव देणार. शेतकऱ्यांचा विश्वास आमची ताकद आहे. तसेच शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाला कारखान्याचे संचालक, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कर्मचारी, ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूक ठेकेदार, पत्रकार, नेते मंडळी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या २१ जणांची माहिती पोलीस संकेतस्थळावर अद्यावत

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी पदभार स्वीकारल्यापासून मकोका, एमपीडीए, ५५ ५६ ५७ मपोका कायद्याअंतर्गत कारवाईचा धडाका सुरूच ठेवला असून या सर्व गुन्हेगारांची माहिती पोलीस संकेतस्थळावर अद्यावत करण्यात आली आहे.



बीड जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षकांच्या सूचनेवरून विविध आधुनिक सुविधा प्रभावीपणे अमलात आणण्यात आल्या आहेत. पोलीस अधीक्षकांच्या संकल्पनेतून नागरिकांच्या सेवेसाठी गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग पारदर्शकपणे आणि तत्परतेने व्हावा या हेतूने २१ गुन्हेगारांना कलम ५५, ५६, ५७ मपोका प्रमाणे पोलीस अधीक्षक आणि उप विभागीय दंडाधिकारी यांनी तडीपार केले आहे. त्याची संकेतस्थळावर माहिती देण्यात आली आहे. नागरिकांनी हे तडीपार ईसम बीड जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात आढळून आल्यास जवळच्या पोलिस ठाण्याला किंवा स्थानिक गुन्हे शाखेला तात्काळ कळवावे. त्यांची नावे गोपनीय ठेवण्यात येतील. कलम ५५ प्रमाणे हद्दपार करण्यात आलेले आजय अशोक तांदळे रा. कोरेगाव, विकास सुभाष सावंत रा. सावंतवाडी, बालाजी राम लांब रा. कोरेगाव, सोमनाथ राजाभाऊ चाळक रा. लहुरी ,आर्यन उर्फ शंकर मधुकर शेप रा.लाडेवडगाव, कल्याण वशिष्ठ शेप रा. लाडेवडगाव, उज्वल उर्फ दादा महादेव मुंडे रा.भायजळी, गणेश उर्फ संकेत सुरेश गंगात्रे रा.आडस, रंगनाथ पाटील लांब रा.बनकारंजा यांचा समावेश आहे. तर कलम ५६ प्रमाणे तडीपार करण्यात आलेले महेश सखाराम केदार रा. मैदवाडी, कृष्णा शामराव आंधळे रा. मैदवाडी, मंगेश उर्फ अनिल बालाजी सोनटक्के रा. अशोक नगर धारूर,आनिस उर्फ युनूस शेख उर्फ पटेल रा.माजलगाव , सिद्धेश्वर दत्तात्रय दराडे रा. संगम ,अजय कृष्णा गवारे रा. फुले नगर परळी, शेरखान उर्फ बब्बू नजीज शेख रा. माजलगाव, लखन चंद्रकांत गायकवाड रा. परळी, अजय उर्फ लोमट्या गौतम साळवे रा. परळी, भारत अशोक चितळकर रा. गुंतेगाव, दीपक आनंता तळेकर रा.फुलसांगवी ,रवींद्र तुळशीराम धुमाळ रा.घुमेगाव यांचा समावेश आहे.

## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त रन फॉर युनिटी

बीड । प्रतिनिधी

भारताचे लोहपुरुष, एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रन फॉर युनिटी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय ऐक्याचा आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देणारी ही धाव आहे. देशाच्या विकासासाठी आणि समाजासाठी सर्व घटकांमध्ये ऐक्याचे बंध निर्माण व्हावेत या हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथून ही धाव सुरू होईल. या कार्यक्रमात पोलीस दल ,शासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, विविध संस्था, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांनी उस्फूर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन बीड पोलीस दलाच्या वतीने करण्यात आले आहे.

पान ६ वरून...

### लेकीला न्याय मागण्यासाठी

हिचीच चौकशी करुन तिच्यावर केलेल्या आरोपांबद्दल खुलासा मागवण्यात आला. सदरील चौकशीच्या उत्तरामध्ये डॉक्टर संपदाने प्रत्येक तक्रारी संदर्भात मुद्देसूद उत्तर दिलेले आहे. संबंधीत उत्तरामध्ये पोलिसांकडुन तसेच तिच्या वरिष्ठ अधिका-यांकडुन तिला कशाप्रकारे मानसिक त्रास देण्यात आला त्याचा सविस्तर खुलासा पोलिस अधिकाऱ्यांच्या नावासहित तिने दिलेला आहे. तरीही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले त्याचाच परिणाम संपदाचा बळी गेला.

करिता सर्व पक्षांच्या वतीने आज वडवणी शहर बंद ठेवण्यात आले होते. त्यासोबत रस्ता रोको ही करण्यात आला यावेळी संबंधित पोलीस अधिकारी तसेच आरोग्य खात्यातील जबाबदार अधिकारी यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. तरी सर्व व्यापारी बांधवांनी सहकार्य केले...

### डॉक्टर संपदा मुंडे

मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे. सदरील आंदोलनामध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई, अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन तसेच मार्ड संघटना अंबाजोगाई सहभागी झाले होते. यावेळी डॉ राजेश इंगोले डॉ नवनाथ घुगे डॉ राहुल धाकडे डॉ सुलभा पाटील डॉ विजय लाड डॉ बळीराम मुंडे डॉ सुनील जाधव डॉ इमरान शेख यांच्यासह स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील मार्ट चे पदाधिकारी व इतर डॉक्टर्स उपस्थित होते.

### पाटोदा कृषी कार्यालयात

लागलेला योजनेचा फायदा नेमका कुणाला पाटोदा कृषी विभागातून लकी ड्रॉ लागलेले शेतकरी योजना जात्यात कुठे चौकशी करावी व लोकप्रतिनिधी याच्यावर अंकुश ठेवावा अशी शेतकऱ्यांना व्यक्त होत आहे

### कडा महेश साखर कारखान्यात

विशेष लेखा परीक्षक बीड आणि तहसीलदार आष्टी यांच्या आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

गेल्या बारा वर्षांपासून संचालक मंडळाने लेखा परीक्षण अहवाल, दोषदुरुस्ती अहवाल व वार्षिक सभा इतिवृत्त सादर केले नाहीत, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तसेच ज.ढ.ज.ढ. अंतर्गत असलेली कार्यवाही व हायकोर्टाची स्थगिती उठवून मंडळावर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनावर अध्यक्ष आनंदराव वायकर, कार्याध्यक्ष बी.एन. झांजे, उपाध्यक्ष डी.व्ही. धुमाळ, सचिव एन.ए. साबळे, सदस्य सय्यद इस्माईल महमंद व एन.डी. कर्डीले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### दुर्गेश धसे यांचा

त्याच्या या साधनेसाठी आणि भारतीय संस्कृतीच्या प्रचारात योगदानाबद्दल त्याला । श्री सत्य साई भारत संस्कृती सन्मान २०२५ अंतर्गत अनुत्तम वेद विद्यार्थी हा बहुमान मिळाला. हा सन्मान ८ जुलै २०२५ रोजी बंगळुरू येथे झालेल्या समारंभात श्रीलंकेतील अध्यात्मिक गुरु थेरू आणि सद्गुरु मधुसूदन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता. यावेळी तळेपिंपळगावचे सरपंच बाळासाहेब चौरे, श्रीकांत धसे, विनायक पांडव, किरण चौरे, गोकुळ डीसले, वाघ सर, गणेश दळवी, राहुल गाडे, रवी राऊत,आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्वराज्य जनजागृती परिषदेचे पंधरा जिल्हाध्यक्ष जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

लोकशिक्षण आणि लोकजागृती हा उद्देश समोर ठेवून स्वराज्य जनजागृती परिषद हे संघटन स्थापन करण्यात आले आहे. परिषदेच्या मराठवाडा आणि पुणे विभागातील तेरा जिल्ह्यांच्या त्याचप्रमाणे अकोला, वाशिम, अहिल्यानगर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यानंतर ॲड. अजित एम. देशमुख यांनी ही घोषणा केली आहे.

परिषदेचे कामकाज ''व्यक्तीला नव्हे तर भ्रष्ट व्यवस्थेला विरोध'' या तत्त्वाने चालेल. त्याचप्रमाणे लोकशिक्षण आणि लोकजागृती हा प्रमुख उद्देश असेल. याशिवाय आज पर्यंत चालत आलेले भ्रष्टाचाराला विरोध हे काम देखील तेवढ्याच प्रगल्भतेने चालू ठेवण्यात येणार आहे. सोळा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी प्रत्यक्ष संवाद साधल्यानंतर आणि मेळावे आणि बैठका घेतल्यानंतर सक्रिय कार्यकर्त्यांची निवड जिल्हाध्यक्ष म्हणून करण्यात आली आहे. परिषदेचे कामकाज वाढवण्यासाठी जिल्हाध्यक्षांना एक आचारसंहिता कळविण्यात आली आहे. पद्धतशीरपणे समाजातील सर्व घटकांना परिषदेमध्ये सहभागी करून चारित्र्यसंपन्न कार्यकर्त्यांना कामाला लावण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. निवड झालेल्या पंधरा जिल्हा अध्यक्षांची नावे पुढे दिली असून जिल्ह्याचे नाव कंसात दिले आहे. इंजिनीयर बालाजी जळबाजी गायकवाड (बीड), प्रा. ज्ञानेश्वर हरिकिसन गोराडे (छत्रपती संभाजीनगर), धनाजी भीमराव कुरुंद (धाराशिव), प्रा. डॉ. भागवत अंकुश कराडकर (जालना), प्रा. तात्यासाहेब जगन्नाथ नंदवे (लातूर), संपादक बालाजी



आबाजी भुसारे (परभणी), सुधाकर बळीराम संगेकर (हिंगोली), ॲड. महेश कुंडलिक डुके (पुणे ग्रामीण), विक्रम गणपतराव बर्गे (सातारा), उमेश महादेव भोसले (सोलापूर), धैर्यशील आनंदराव पवार (सांगली), पवन सारंगधर कुमकर (अकोला),अविनाश सखाराम पसारकर (वाशिम) आणि टिळक गोपीनाथ बोस (अहिल्यानगर), राजेंद्र गणपती लाड (पुणे शहर) या चौदा जिल्ह्यांचा यात समावेश आहे. स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने जनतेला स्वातंत्र्य मिळाले नाही. त्यामुळे लोकशिक्षण आणि लोकजागृतीची गरज आहे. शासन आणि प्रशासनाला प्रश्न विचारणारा नागरिक तयार होणे आवश्यक आहे. परिषदेमार्फत शेतकरी, विद्यार्थी, नागरिक या सर्वांसाठी त्याचप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावयाचे आहेत. त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून कार्यकर्ता उभा करण्यासाठी मेहनत घेतली जाणार आहे. जिल्हाध्यक्षांनी आता पारदर्शकतेने कामाला लागावे. परिषदेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आणि जनतेची कामे नडु नयेत, यासाठी सक्रिय रहावे. जनतेला मार्गदर्शन करावे. आपल्या कामाचा अहवाल परिषदेच्या आदेशाप्रमाणे देत रहावे, असे आदेश देण्यात आले असून परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी आणि विश्वस्त मंडळाने नवनियुक्त पंधरा जिल्हा अध्यक्षांचे अभिनंदन केले आहे. परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप (सातारा), परिषदेचे सचिव तुषार अच्युतराव पाटील (कुर्ला), सहसचिव अरुण मोहन बोबडे (धाराशिव), कोषाध्यक्ष शिवाजी बबन खेडकर (पुणे) सदस्य विष्णू भगवान ढवळे (छत्रपती संभाजीनगर) आणि गोवर्धन विठ्ठलराव मस्के (बीड) यांच्या सह चर्चा करून हा निर्णय घेण्यात आला आहे. स्वराज्य जनजागृती परिषद नागरिकांना मार्गदर्शन करीत लहान लहान प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करेल. सजग नागरिक निर्मितीसाठी झटने आता गरजेचे असल्याने या सर्व बाबी आम्ही प्रामुख्याने जनतेसमोर घेऊन येऊ, असे याप्रसंगी ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

# परभणीत दोन लाख हेक्टरवरील कपाशीला फटका

परभणी : यंदा जून ते सप्टेंबर या कालावधीतील अतिवृष्टी व पुरामुळे परभणी जिल्ह्यातील १ लाख ९० हजार ४८३ हेक्टरवरील (९७.७९ टक्के) कपाशीचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे. गोदावरी नदी व उपनद्यांच्या बॅकवॉटरमध्ये बुडल्यामुळे कपाशीच्या अकाली पऱ्हाट्या झाल्या असून वाती एवढासुद्धा कापूस मिळणार नाही. उरल्यासुरल्या कपाशीच्या फुटलेल्या बोंडातील कापूस भिजल्यामुळे धागा कमकुवत झाला आहे.

परभणीतील गोदावरी, दूधना, पूर्णा नद्यांच्या खोऱ्यात कपाशीचे दर्जेदार उत्पादन मिळते. जिल्ह्यात २०१९ ते २०२४ या वर्षातील कपाशीचे सरासरी क्षेत्र १ लाख ९१ हजार ९५४ हेक्टर आहे. हेक्टरी ३ क्विंटल ५७ किलो (रुई) उत्पादकतेनुसार एकूण ६८ हजार ६०२ टन उत्पादन मिळाले. २०२४ मध्ये कपाशीची १ लाख ९७ हजार हेक्टरवर लागवड असताना हेक्टरी सरासरी ४ क्विंटल २७ किलो (रुई) उत्पादकेतनुसार एकूण ८४ हजार ५४० टन उत्पादन मिळाले होते. यंदा १ लाख ९४ हजार ७८६ हेक्टर लागवड झाली आहे. परंतु अतिवृष्टीमुळे ९७.७९ टक्के क्षेत्रावरील नुकसान झाल्यामुळे उत्पादनात मोठी घट येणार आहे. जुलै ते सप्टेंबरमधील अतिवृष्टिमुळे पिकांत पाणी साचून बोंडे सड झाली. पाथरी, मानवत, सोनपेठ, गंगाखेड, पालम, पूर्णा या तालुक्यांतील पीक कुजून गेले असून शेतकऱ्यांना पऱ्हाट्या उपटण्याचा भुर्दंड सोसावा लागणार आहे.



## काळ्या हळदीची शेती करेल मालामाल; ५०० रुपये किलो मिळतो भाव!



हळद म्हटले की आपल्या डोळ्यासमोर पिवळ्या हळकुंडाचे चित्र उभे राहते. हळद हा मसाल्याचा पदार्थ असून, बाजारात त्याला नेहमीच मागणी असते. इतकेच नाही तर हळद पिकाला शेतकऱ्यांना दरही चांगला मिळतो. सध्या हळदीला राज्यातील बाजार समित्यांमध्ये सरासरी १५००० ते १७००० रूपये प्रति क्विंटलपर्यंत दर मिळत आहे. आज आपण पिवळ्या हळदीपेक्षा अधिक दर मिळवून देणाऱ्या काळ्या हळदीबाबत जाणून घेणार आहोत. पिवळ्या हळदीप्रमाणे काळ्या हळदीचे अनेक औषधी गुणधर्म आहे. ज्यामुळे बाजारात तिला अधिक मागणी असते.

किती मिळतो दर?

शेतकऱ्यांना कोणत्याही पिकाचे उत्पन्न घ्यायचे म्हटले तर त्यातून उत्पन्न किती मिळते? हा पहिला प्रश्न पडतो. काळी हळद अनेक ऑनलाइन वेबसाईटवर बाजारभावात चढ-उतार लक्षात घेता, कमीत कमी ५०० रुपये ते जास्तीत जास्त ५००० रुपये प्रति किलोपर्यंत विकली जाते. शेतकऱ्यांनी आपल्या एक एकर जमिनीत काळ्या हळदीची लागवड केल्यास, त्यांना त्यातून जवळपास ५० ते ६० क्विंटल ओली हळद उत्पादित होते.

किती मिळते उत्पन्न?

वाळवून १२ ते १५ क्विंटल सुकी हळदीचे उत्पादन होते. काळ्या हळदीचे उत्पादन तुलनेने कमी होते. मात्र, तिला अधिक दर मिळत असल्याने तिच्यापासून मिळणारे एकरी उत्पन्न अधिक मिळते. १५ क्विंटल उत्पादन पकडल्यास त्याला ५०० रुपये किलोचा दर मिळाला तरी शेतकऱ्यांना एक एकरातून साडे सात लाखांचे उत्पन्न हमखास मिळते. ज्यामुळे काळ्या हळदीची लागवड शेतकऱ्यांसाठी फायद्याची मानली जात आहे.

कोणत्या जमिनीत लागवड?

काळ्या हळदीच्या लागवडीसाठी भुसभुशीत चिकणमाती जमिनीत चांगली मानली जाते. मात्र, ही जमीन पावसाच्या पाण्याचा निचरा होणारी असावी. लागवडीसाठी हेक्टरी सुमारे २ क्विंटल काळ्या हळदीचे बियाणे गरजेचे असते. हळद पिकाला जास्त सिंचनाची गरज नसते. याशिवाय काळ्या हळदीवर जास्त किडींचा प्रादुर्भाव होत नाही. ज्यामुळे कीटकानाशकांवरील खर्च देखील कमी होतो. काळ्या हळदीच्या लागवडीपूर्वी शेणखताचा अधिक वापर केल्यास, भरघोस उत्पादन मिळण्यास मदत होते.

## पूसा नवरंग द्राक्ष वाण; ज्यूस, वाईनसाठी प्रसिद्ध, मिळते भरघोस उत्पादन!

राज्यात द्राक्ष पिकाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. नाशिक व सांगली जिल्हा द्राक्ष उत्पादनासाठी विशेष प्रसिद्ध आहे. इतकेच नाही राज्यातील अन्य भागांमध्येही कमी अधिक प्रमाणात द्राक्षाचे उत्पादन घेतले जाते. पावसाने आणि वातावरणाने साथ दिली नसली तरी शेतकऱ्यांनी चांगले उत्पादन घेतले आहे. द्राक्ष शेतीतून अधिक नफा मिळवण्यासाठी, त्याची अधिक उत्पादन देणारी जात निवडणे खूप गरजेचे असते.



पूसा नवरंग वाणाची वैशिष्ट्ये : पूसा नवरंग असे या द्राक्ष वाणाचे नाव असून, भारतीय कृषी संशोधन संस्थेकडून (आयसीएआर) तिची निर्मिती करण्यात आली आहे. हे द्राक्ष वाण उत्पादन देण्यासह लवकर काढणीला येते. या वाणाच्या झाडाला येणाऱ्या द्राक्षांचा आकार हा मध्यम असतो. पूसा नवरंग ही द्राक्षाची संकरित जात असून, तिचे फळ हे बीजरहित असते. याशिवाय या वाणाच्या द्राक्षांचा रंग हा काळा असतो.

माती परीक्षण किट : या द्राक्ष वाणाचा उपयोग हा ज्यूस आणि वाईन बनवण्यासाठी केला जातो. महाराष्ट्रात याच द्राक्ष वाणाच्या मदतीने पुणे येथील राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राने पूसा नवरंग आणि फ्लेम सिडलेस जातीच्या संकरण प्रक्रियेतून मांजरी मेडिका ही जात विकसित केली आहे. जी राज्यात ज्यूस निर्मितीसाठी विशेष प्रसिद्ध आहे.

अन्य महत्वाचे द्राक्ष वाण : थॉमसन सिडलेस, तास-ए-गणेश, सोनाका, माणिक चमन, शरद सिडलेस, फ्लेम सिडलेस व रेडग्लोब ही महाराष्ट्रातील प्रसिद्ध आणि अधिक उत्पादन मिळवून देणारी द्राक्ष वाण आहेत. तर अलीकडे नाशिक येथील सह्याद्री फार्म्स या शेतकरी उत्पादक संस्थेकडून 'आरा' हे द्राक्ष वाण विकसित करण्यात आले आहे. हे देखील उत्पादन मिळवून देणारे वाण आहे. या वाणाचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे इतर सर्व वाणांपेक्षा त्याला निर्यातीसाठी मागणी असल्याने, त्याला अधिकच दर मिळतो.

महाराष्ट्रात ७० टक्के उत्पादन : भारतीय फळबाग शेतीमध्ये द्राक्ष फळपिकाला मोठे स्थान आहे. भारतातील महाराष्ट्र हे आघाडीवरील द्राक्ष उत्पादक राज्य असून, राज्यात देशातील एकूण उत्पादनापैकी जवळपास ७० टक्के द्राक्ष उत्पादन एकट्या महाराष्ट्रात होते. त्यातही राज्यातील नाशिक जिल्हा हा द्राक्ष उत्पादनासाठी विशेष प्रसिद्ध आहे. याशिवाय देशातील पंजाब, राजस्थान हरियाणा, बिहार, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये देखील द्राक्ष उत्पादन होते.

## रब्बी हंगामातील भेंडी लागवड

रब्बी हंगाम सुरू होणार आहे. या हंगामात शेतकरी बराच भाजीपाला लागवड करतात. या पिकामध्ये भेंडी ही मुख्य भाजी मानली जाते. याची देशभरात मोठी मागणी आहे. भेंडी लागवडीपासून शेतकरी एका हंगामात चांगले उत्पन्न मिळवू शकतात. चला मग भेंडीच्या प्रगत प्रकार आणि तिच्या लागवडीबद्दल जाणुन घेऊ.

रब्बी भेंडी : या हंगामात भेंडीची लागवड केल्याने भेंडीचे झाड लहान राहते आणि जलद उत्पन्न देते. प्रगत वाण : परभणी क्रांती, पुसा सावनी, पंजाब पद्मिनी, पूजा ए -४, आर्का भय, अर्का अनामिका, पंजाब -७, पंजाब -१३ भेंडी, योग्य जमीन : भेंडीची लागवड सर्व प्रकारच्या मातीमध्ये करता येते, परंतु चिकणमाती, बाळूई चिकणमाती आणि मटियार लोम माती अधिक उत्पादनासाठी योग्य



मानली जातात. बियाणे प्रक्रिया : यासाठी बिया २४ ते ३६ तास पाण्यात भिजत ठेवल्या जातात. यानंतर त्या सावलीच्या जागी सुकत ठेवा. बियाणे पेरण्यापूर्वी कोणत्याही बुरशीनाशकात प्रति किलो २ ग्रॅम दराने चांगले मिसळावे. बियाण्याचे प्रमाण : उन्हाळी हंगामात भेंडीच्या लागवडीसाठी २० किलो तर पावसाळ्याच्या लागवडीसाठी प्रति हेक्टरी १२ किलो बियाणे आवश्यक आहे. पेरणीची पद्धत : भेंडी पेरताना एका रांगेपासून दुसऱ्या रांगेचे अंतर ३० सेमी आणि एका रोपांचे ते दुसऱ्या रोपाचे अंतर १२ ते १५ सें.मी. असावे. सिंचन : संपूर्ण शेताला योग्य आकाराच्या पट्ट्यामध्ये विभागून घ्या जेणेकरून सिंचनामध्ये सोयीचे होईल. पावसाळ्यात पाणी साचू नये म्हणून भेंडीची पेरणी उंच बेडमध्ये करावी. कापणी : सुमारे अडीच महिन्यांनी पीक कापणीसाठी तयार होते. तोडणीनंतर ३ ते ५ दिवस भेंडी खाण्यायोग्य असते, तर पुसा सावनी ह्या प्रकारात हा कालावधी ७ दिवस असतो. उत्पादन : योग्य तंत्राने भेंडीची लागवड केल्यास प्रति हेक्टरी ११५ ते १२५ क्विंटल उत्पादन मिळू शकते. शेतकरी बांधवांना यातून चांगले उत्पन्न मिळू शकते.

## रंगीबेरंगी फुलकोबीची लागवड पद्धती; विक्रीतून मिळू शकतो मोठा नफा!

रंगीत फुलकोबीच्या लागवडीसाठी ४ ते ५ आठवड्याच्या रोपांची शेतात ६० ६० सें.मी. आणि ६०४५ सें.मी. अंतरावर लागवड करावी. रोपे पुनर्लागवड नंतर पिकाला हलके सिंचन देणे आवश्यक आहे.

खत व्यवस्थापन : कुजलेले शेणखत उपलब्ध असल्यास लागवडीच्या १५ दिवस अगोदर १०० क्विंटल शेणखत आणि कंपोस्ट खताची संपूर्ण मात्रा शेतात मिसळावी. ४५ ते ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि १५-१६ किलो पालाश प्रति एकर वापरावे. स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा आणि अर्धी नत्राची मात्रा लागवडीच्या १५ दिवस आधी शेतात टाकून चांगले मिसळावे. नत्राची उर्वरित मात्रा दोन समान भागांमध्ये विभागून पुनर्लागवडीनंतर ३०-३५ आणि ४५ ते ५० दिवसांनी टॉप ड्रेसिंग म्हणून द्यावे. याशिवाय जमिनीत तण काढताना व मशागत करताना ६०० ग्रॅम अमोनियम मॉलिब्डेट आणि ५ किलो बोरॉन प्रति एकर जमिनीतून द्यावे.

सिंचन आणि तण नियंत्रण : पिकाच्या यशस्वी लागवडीसाठी रोपाची लागवड केल्यानंतर गरजेनुसार १० ते १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. रंगीत



फुलकोबी लागवडीनंतर तीन आठवड्यांनी खुरपणी करून मातीची भर द्यावी. यानंतर गरजेनुसार खुरपणी करावी.

कीड आणि रोगांचे व्यवस्थापन : रंगीबेरंगी फुलकोबीमध्ये, डायमंड बॅक मॉड आणि मस्टर्ड फ्लाय या मुख्य किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सेंद्रिय औषध बॅसिलस थूरिंगिएन्सिसच्या द्रावणाची फवारणी करावी, असे प्रौढ कीटक पकडण्यासाठी फेरोमोन सापळ्यांचा वापर करावा. रंगीत फुलकोबीमध्ये मर रोगास प्रतिबंध करण्यासाठी ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. शेतात २० ग्रॅम प्रति चौरस मीटर या दराने जमिनीत कंपोस्ट खत मिसळून वापरा.

हा रोग आढळल्यास रोपवाटिकेला पाणी देऊ नका. इतर प्रमुख रोगात काळी सड रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास रोगट झाडे गोळा करून नष्ट करावीत. हा रोग टाळण्यासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड आणि स्ट्रेप्टोसायक्लिन २०० पीएम या द्रावणाची फवारणी करावी.

काढणी आणि उत्पादन : रंगीबेरंगी फुलकोबीचे पीक लागवडीनंतर १०० ते ११० दिवसांनी काढणीसाठी तयार होते. पिकाचे सरासरी एकरी १०० ते १२५ क्विंटल उत्पादन मिळते. एक एकरात फुलकोबीची लागवड केल्यास सुमारे ५० हजार रुपये खर्च येतो. बाजारात ते २५ रुपये किलोने सहज विकले जाते. अशा प्रकारे १०० क्विंटलपासून एकूण उत्पन्न सुमारे अडीच लाख रुपये होईल. निविष्ठा खर्च कमी केल्यास शेतकर्याला २ लाख रूपयांचा निव्वळ नफा मिळेल.

## दिन विशेष

**जागतिक दिवस:**
**जागतिक बचत दिन**

### महत्वाच्या घटना

१९२० : सिडनी येथे कम्युनिस्ट पार्टी ऑफ ऑस्ट्रेलियाची स्थापना.
१९२८ : लाहोर येथे सायमन कमिशनचा निषेध करणार्या लाला लजपतराय यांच्यावर ब्रिटिश पोलिसांनी लाठीहल्ला केला. त्यातच पुढे १७ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांचा अंत झाला.
१९४५ : भारताला संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्त्व मिळाले.
१९६० : ब्रिटन मध्ये पहिल्यांदा किडनीचे प्रत्यारोपण करण्यात आले.
१९६६ : शिवाजी पार्कवर शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा झाला.
१९७३ : इस्तंबुलमधील बॉस्पोरस पूल पूर्ण झाल्यामुळे युरोप आणि आशिया जोडले गेले.
१९९५ : कॅनडातील क्वेबेक प्रांताने विभक्त होण्यासाठी घेतलेल्या सार्वमतात जनतेने ५०.६% विरुद्ध ४९.४% मतांनी कॅनडातच राहण्याचा निर्णय दिला.
२०१३ : सचिन तेंडुलकर आपल्या कारकिर्दीतील शेवटचा रणजी सामना खेळला. हरयाणाविरुद्ध झालेल्या या सामन्यात सचिनने विजयी फटका मारला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३५ : जॉन ॲडॅम्स अमेरिकेचे २ रे राष्ट्राध्यक्ष आणि पहिले उपराष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ४ जुलै १८२६)
१८५३ : ब्रिटीश कालीन भारतातील प्रशासकीय अधिकारी व राष्ट्रवादी तसचं, भारतीय क्रांतिकारक संस्था अनुशीलन समितीचे प्रारंभिक सदस्य प्रमथनाथ मित्र यांचा जन्मदिन.
१८८७ : सुकुमार रॉय बंगाली साहित्यिक आणि 'संदेश' या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक, चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रॉय यांचे वडील (मृत्यू: १० सप्टेंबर १९२३)
१९०९ : डॉ. होमी जहांगीर भाभा भारतीय भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २४ जानेवारी १९६६)
१९११ : मध्य प्रदेश राज्याचे माजी राज्यपाल आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक राजकारणी भाई महावीर यांचा जन्मदिन.
१९३२ : भारतीय इतिहासकार आणि लेखक बरुन डी यांचा जन्म. (मृत्यू: १६ जुलै २०१३)
१९४९ : प्रमोद महाजन केन्द्रीय मंत्री व राज्यसभा खासदार (मृत्यू: ३ मे २००६)
१९५१ : भारतीय ड्रमर आणि गीतकार त्रिलोक गुर्टू यांचा जन्म.
१९६० : डिएगो मॅराडोना अर्जेंटिनाचा फूटबॉलपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८३ : भारतीय तत्त्वज्ञ आणि विद्वान दयानंद सरस्वती यांचे निधन. (जन्म: १२ फेब्रुवारी १८२४)
१९७४ : बेगम अख्तर गझल, दादरा आणि ठुमरी गायिका. गझल गायकीला त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. (जन्म: ७ आक्टोबर १९१४)
१९८४ : प्रसिद्ध चित्रपट निर्माता, लेखक, दिग्दर्शक आणि संगीतकार ख्वाजा खुर्शीद अन्वर यांचे निधन.
१९९० : व्ही. शांताराम चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेते, पद्मश्री, दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (जन्म: १८ नोव्हेंबर १९०१)
१९९० : विनोद मेहरा अभिनेता (जन्म: १३ फेब्रुवारी १९४५)
१९९४ : सरदार स्वर्ण सिंग केन्द्रीय मंत्री (जन्म: १९ ऑगस्ट १९०७)
१९९६ : प्रभाकर नारायण ऊर्फ 'भाऊ' पाध्ये लेखक, पत्रकार व कामगार संघटनेचे कार्यकर्ते (जन्म: २९ नोव्हेंबर १९२६)
१९९८ : विश्राम बेडेकर लेखक व दिग्दर्शक (जन्म: १३ ऑगस्ट १९०६)
२००५ : भारतीय राजकारणी शम्मीशेर सिंह शेरी यांचे निधन.
२०११ : अरविंद मफतलाल उद्योगपती (जन्म: २७ आक्टोबर १९२३)
२०१४ : सुप्रसिद्ध भारतीय साहित्यकार रॉबिन शॉ यांचे निधन.

## रांगडा कांद्याची लागवड

महाराष्ट्रात अनेक भागात रांगडा कांद्याची लागवड होते कारण या हंगामात लागवड केलेल्या कांद्याची साठवणक्षमता खरिप हंगामापेक्षा उत्कृष्ट असते. रांगड्या कांद्याच्या लागवडीसाठी ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये रोपवाटिका तयार केली जाते आणि ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात रोपांची पुनर्लागवड केली जाते. जाणून घेऊ या रांगडा कांद्याचे सध्या करावयाचे व्यवस्थापन.



रांगडा कांद्याचे व्यवस्थापन : एक एकर कांदा लागवडीसाठी दोन गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी. एक एकर लागवडीसाठी दोन ते तीन किलो बियाणे पुरेसे आहे. पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम कार्बेन्डाझिम हे बुरशीनाशक चोळावे. पेरणीपूर्वी २०० किलो शेणखतासोबत ५०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हिरीडी वापरून जमिनीत मिसळावे. रोपवाटिकेत ठिबक किंवा स्प्रिंकलर सिंचन पद्धतीचा वापर करण्यासाठी जमिनीपासून १० ते १५ सें.मी. उंच, १ ते १.२ मीटर रूंद आणि गरजेनुसार लांब गादीवाफे जमिनीच्या उताराला आडवे तयार करावेत. यामुळे रोपांची वाढ एकसारखी होते आणि पाणी फार काळ साचून राहत नाही, रोपे कुजत किंवा सडत नाहीत, लावणीच्या वेळी सहज उपटून काढता येतात, रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. वाफे तयार करताना दर १६०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम स्फुरद, ४०० ग्रॅम पोटॅश प्रति २०० चौरस मीटर याप्रमाणे खते द्यावीत.

रुंदीशी समांतर ५-७.५ सें.मी. अंतरावर एक रेघा पाडून १-१.५ से.मी. खोलीवर बियाणे पेरावे. पेरणीनंतर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खताने बियाणे झाकून ठेवावे, नंतर झारीने जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पद्धतीने पाणी द्यावे. पेरणीनंतर २० दिवसांनी हाताने खुरपणी करून ८०० ग्रॅम प्रति २०० चौरस मीटर या प्रमाणात नत्र द्यावे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# उद्योग व्यवसायात सोशल मिडिया,आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग गरजेचा - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी


व्यापाऱ्यांनी आपला उद्योग व्यवसाय वाढी साठी वेळेचा सद्धपयोग करून सोशल मिडिया, खरीदी-विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रगती साधावी, ही काळाची गरज आहे असे उद्गार जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी व्यक्त केले. कॅन्फडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) अंतर्गत व्यापारी महासंघ व जनरल मर्चन्टस्? असोसिएशन जिल्हा जालनाच्या संयुक्त विद्यमानाने प्रतिवर्षाप्रमाणे दिवाळी स्नेह मिलन दि. २६ ऑक्टोबर २०२५ रोजी जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे अति उत्साहात पार पडला. समारोहाचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. विशेष अतिथी म्हणून जिल्हा पोलिस अधिक्षक श्री अजय बंसल, संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सचिन निवंगुणे, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष पद, आयोजक व मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनी भुषविले. प्रमुख अतिथी म्हणून राज्य उपाध्यक्ष सतिष पंच, उद्योजक जगदीश प्रिथ्यानी, दिनेश भारुका उपस्थित होते. पुढे बोलतांना जिल्हाधिकारी म्हणाले जिल्ह्याचा, देशाचा जडण-घडणीत उद्योजक, व्यापाऱ्यांचा फार मोठा योगदान



आहे, जालना जिल्हा हा महाराष्ट्रात व्यापारी जिल्हा म्हणून नाव लौकिक आहे. जसे हाताची पाँच बोट एकत्रीत आल्यास एक व्रजमुठ तैयार होते, अगदी तसेच आपल्या व्यापारात या हाताच्या पाँच बोटा प्रमाणे सर्वांनी पंचमृती अंगी काढली पाहिजे. जिल्ह्यात अनेक समस्या आहे, आपण सर्वांनी मिळून सोडविण्यासाठी सहकार्यासाठी सुचना कळवावी. आपण समाजातील व्यापारी वर्ग, संस्था व सुजान नागिरक मिळून चर्चा घडवून आणूयात, अनेक प्रश्नांवर बोलुन त्यांचे निराकरण करु. जिल्ह्यातून विशेष करून ग्रामीण भागातुन महिला व्यवसायिका मोठ्या प्रमाणावर आल्या बद्दल कौतुक करून नवीन वर्षाची शुभेच्छा दिल्या. जिल्हा पोलिस अधिक्षक मार्गदर्शन करताना महत्वाची बाजार पेठ म्हणून जालनाचा इतिहास आहे. छत्रपति शिवाजी महाराजाच्या काळात ही व पुढे ही आपला जालना जिला नेहमीच व्यापारी वर्गाची मोठी बाजारपेठ अशी ओळख म्हणून देशात विख्यात आहे. येथील स्टील, बियाणे, दालमिल, कापड, अनाज मंढी नेहमीच चर्चात असते. चोरी, चपाटी, दरोडे, खंडणी अनेक प्रकारचे गुन्हा घडत असतात. आपल्या सुरक्षतेसाठी प्रतिष्ठाणात आत व बाहेर सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसवा त्यामुळे गुन्हेगाराला ओळखण्यास यंत्रणेला मदत होते. पोलीस प्रशासन म्हणून नेहमीच सुरक्षेसाठी तत्पर आहोत. नेहमीच व्यापारी महासंघाच्या सहकार्य असतेच असे श्री बंसल म्हणाले. राज्य अध्यक्ष निवंगुणे मार्गदर्शन करताना संपुर्ण महाराष्ट्रात फिरताना जालना जिल्ह्याचे कार्य सर्वात उत्कृष्ठ आहे, म्हणून मागील राष्ट्रीय अधिवेशनात जालना जिल्ह्याला पुरस्कार सुध्दा दिलेला आहे, जालना पेर्टन राज्याच्या सर्व जिल्ह्यात राबवू, व्यापारी महासंघात बंब आणि पंच यांच्या कार्य प्रशंसनीय आहे, असे निवंगुणे म्हणाले. अध्यक्षीय भाषण करताना बंब म्हणाले जिल्ह्याचा सर्व तालुका अंतर्गत ग्रामीण भागात जवळपास ५० शाखा कार्यरत आहे. शहरात सुध्दा प्रत्येक वार्डात संघटनेची शाखा उघडण्यात आलेली आहे. संपुर्ण जिल्ह्याची जनगणना करून दिशा-निर्देशिका प्रकाशित करून निःशुल्क वितरण करण्यात आली आहे. जिल्ह्यात उद्योग व्यवसाय करणाऱ्यांची २०००० संख्या आहे. ग्रामीण भागातील लहान-सहान दहा हजार व्यापाऱ्यांना प्रत्येकी १ लाख रुपयाचे अपघाती विमा निःशुल्क देण्यात आले आहे. इतकी मोठी योजना व्यापाऱ्यांना देणारा जालना जिल्हा फक्त महाराष्ट्रात नाही देशात एकमेव जिल्हा आहे. पंतप्रधानाच्या आदेशानुसार व संघटनेचे राष्ट्रीय प्रमुखांच्या सुचने ने मागील महिण्यापासुन संपुर्ण मराठवाड्यात स्वदेशी वस्तुंना प्राधान्य देऊन विदेशी मालाची खरेदी-विक्री बंद हा अभियान राबविण्यात आले आहे. अंतिम श्वासा पर्यंत समाजासाठी, गरजुंसाठी व व्यापाऱ्यांच्या हितात काम करीत राहील, असे बंब म्हणाले. श्री पंच मनोगत व्यक्त करताना व्यापाऱ्यांच्या संकटात अडी-अडचणात आम्ही सदैव तत्पर आहोत. रखडलेल्या फुले-मार्केट उभारणीचा प्रश्न व तसेच व्यापारी मतदार संघ असला पाहिजे असे पंच म्हणाले. महिला आघाडीची अध्यक्षा सौ. सिता मोहिते विचार मांडताना महिलांनी फक्त चुल-मुल पर्यंत न राहता उद्योग व्यवसायात पुढे यावे, जेणे करून आपले कुटुंब चालविण्यास मदत होईल, असे सौ. मोहिते म्हणाले. कार्यक्रमाचा यशस्वीतेसाठी अंकुश राऊत, मो. कासीम बावला, जगन्नाथ थोटे, विजयराज सुराणा, शिवाजी तनपुरे, ॲड. सुब्रह्मण्यम अय्यर, प्रमोद जोशी, सुभाष सोनुने, मकरंद शहापुरकर, राम मोहिते, दुर्गाप्रसाद लड्ढा, संतोष मुंदडा, देवेन्द्र सावजी, संतोष मोरे, महिला आघाडीची सौ. आनंदी अय्यर, सौ. प्रिया जोशी, अब्बास खाँ, पुंजाराम शेळके आदिनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे उत्कृष्ठ सुत्र संचालन ॲड. अभय सेठिया व दीपक मोदी यांनी केले तर आभार सचिव प्रविण मोहता यांनी मानले. कार्यक्रमात जालना शहरातील व ग्रामीण भागातील महिला-पुरुष, उद्योजक, व्यवसायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घाटीतून दिलेली २८०० जन्म प्रमाणपत्रे रद्द !



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातून (घाटी) देण्यात आलेली २८०० जन्म प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली आहेत. विलंबित जन्म प्रमाणपत्रे देण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांकडून तसे आदेश प्राप्त करून घेणे गरजेचे असते. परंतु अशा आदेशांविनाच घाटीतून परस्पर ही प्रमाणपत्रे दिली गेली. आता ही सर्व प्रमाणपत्रे परत घेण्यात येणार आहेत.

भाजप नेते किरीट सोमय्या यांनी बोगस जन्म मृत्यू प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावर सोमवारी अप्पर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांची भेट घेतली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांच्यासह सार्वजनिक आरोग्य विभाग, महापालिका, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच महसूल विभागाच्या अधिकऱ्यांची उपस्थिती होती.

जिल्ह्यात बांगलादेशी नागरिकांना मोठ्या प्रमाणावर बोगस जन्म मृत्यू प्रमाणपत्रे वितरित झाल्याचा आरोप सोमय्या यांनी केलेला आहे. त्यामुळे संबंधितावर कारवाईसाठी सोमय्या हे सातत्याने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करत आहेत.

सोमवारच्या बैठकीत प्रशासनाने त्यांना आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. घाटीतून एकूण ४९०० जन्म प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. पडताळणीनंतर त्यातील २८०० जन्म प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली. आता ही प्रमाणपत्रे परत घेण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून एक समिति नियुक्त केली जाणार आहे, असे अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

**सिल्लोडमध्ये २३४ जणांविरोधात कारवाई**

जन्म मृत्यू प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी जिल्हा प्रशासनाने दोन समित्या नियुक्त केल्या होत्या. त्यातून बऱ्याच गोष्टी समोर आल्या आहेत. छत्रपती संभाजीनगर एसडीएम यांनी चौदाशे अर्ज मान्य केले होते, त्यांचे पुनर्निरीक्षण करून दोनशे अर्जदारांविरोधात कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत १५० जणांवर एफआयआर दाखल झाले असून उर्वरित तीस, चाळीस जणांवर लवकरच एफआयआर दाखल होणार आहे. सिल्लोडमध्ये २३४ जन्म प्रमाणपत्र लाभार्थीविरोधात पोलिस तक्रार दाखल करण्याचा निर्णय तेथील एसडीएमने घेतला आहे, असे किरीट सोमय्या यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# शेतजमीन नुकसान दुरुस्तीसाठी तातडीने अंदाजपत्रक तयार करण्याचे आ.लोणीकर यांचे निर्देश

जालना

मंठा तालुक्यातील पूर्णा नदी आणि परतूर तालुक्यातील गोदावरी नदीच्या पुरामुळे शेतकऱ्यांच्या जमिनींना मोठा फटका बसला आहे. अतिवृष्टीमुळे पिकांसह जमिनीतील गाळ वाहून गेल्याने शेतात मोठमोठे खड्डे पडले आहेत. या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर आमदार बबनराव लोणीकर यांनी तातडीने कारवाईचे निर्देश दिले आहेत. प्रभावित शेतकऱ्यांनी याबाबत केलेल्या क्रांतीच्या अनुषंगाने माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी तक्रार नोंदवली होती. त्यानुसार, राज्य सरकारने खरडलेल्या शेतजमिनींच्या दुरुस्तीसाठी विशेष जारी केला आहे. या अंतर्गत विभागामार्फत डेप्युटी कलेक्टर यांच्या देखरेखीखाली अंदाजपत्रक तयार करून मंजुरी देण्याची प्रक्रिया सुरू होणार




आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी कृषी विभागाचे अधीक्षक कापसे, रोडगे, जिल्हा परिषद कृषी अधिकारी, पंचायत समिती कृषी विभाग, मंठा व परतूर तालुक्यांचे गटविकास अधिकारी आणि तहसीलदार यांना समन्वयाने काम करण्याचे आदेश दिले आहेत. त्यांनी पुढील ८ दिवसांत अंदाजपत्रके तयार करून जिल्हाधिकारी कार्यालयातील विभागाकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबतही चर्चा झाली असून, लवकरच दुरुस्तीची कामे सुरू होण्याची शक्यता आहे. प्रभावित शेतकऱ्यांनी स्थानिक तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून पंचनामा प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार लोणीकर यांनी केले आहे.

अंतर्गत जमिनी दुरुस्तीच्या कामांना लवकरच सुरुवात होईल, अशी माहितीही त्यांनी दिली. महाराष्ट्र सरकारने पूरग्रस्त शेतजमिनींच्या दुरुस्तीसाठी विशेष जारी केला असून, अंतर्गत ₹३ लाख प्रति हेक्टरपर्यंत निधी उपलब्ध आहे. या प्रक्रियेत खालील टप्पे समाविष्ट आहेत:

# छत्रपती संभाजीनगर-पुणे रस्त्यावरील टोल वसुली थांबवा

## एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांचे केंद्रीय नितीन गडकरी यांना पत्र

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

वाळूज ते पुणे या महामार्गावर ठिकठिकाणी खड्डेच खड्डे झाल्याने अतिशय दयनीय स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती होत नाही, तोपर्यंत जडवाहनांची टोल वसुली थांबविण्यात यावी, असे पत्र एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांना पाठविले आहे.




छत्रपती संभाजीनगर ते पुणे या महामार्गावरील रस्त्यांची अत्यंत वाईट अवस्था झाली आहे. या रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांकडून नियमितपणे टोल वसुली केली जात आहे. परंतु, रस्त्याच्या दुरुस्तीकडे शासनाचे सपशेल दुर्लक्षच होत आहे. या रस्त्याच्या दयनीय स्थितीमुळे आज संभाजीनगर ते पुणे जाण्यासाठी तब्बल सात ते आठ तासांचा अवधी लागत आहे. केवळ रस्त्याच्या दुरवस्थेमुळेच ही स्थिती आहे. या रस्त्याबाबत सतत मीडियावरून टीका होत आहे. सोशल वाहनधारकांसह प्रवाशांतूनही ओरड होत आहे. मात्र, त्यानंतरही रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्षच केले जात आहे. खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होत आहे. तसेच इंधनाचा अपव्यय वाढला आहे असून अपघाताच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती होईपर्यंत टोल वसुली थांबविण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे माजी खासदार जलील यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे केली आहे.

# बीडमध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म समकालीन आकलनावर धम्म चर्चा

बीड/प्रतिनिधी

समाज परिवर्तनाचे अधिष्ठान असलेल्या सम्यक बुद्धांच्या शिकवणीचा आधुनिक संदर्भातून आढावा घेण्यासाठी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म : समकालीन आकलन' या विषयावर भव्य धम्म चर्चा आयोजित करण्यात आली आहे. ही चर्चा रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता, हॉटेल निलकमल, बीड येथे पार पडणार आहे.

या धम्म चर्चेत डॉ. प्रकाश सिरसट आणि डॉ. उमेश बागडे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाचे उदघाटन जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी डॉ. विक्रम धन्वे राहणार आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. राजेश शिंदे करतील, तर सूत्रसंचालन सुनिल डोंगरे करणार आहेत. फुले-आंबेडकर विचार सभेचे संयोजक वंचितचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, डॉ. बी. एन. जावळे आणि ॲड. तेजस वडमारे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की "या अर्थपूर्ण व चिंतनपर धम्म चर्चेत सहभागी होऊन समाज परिवर्तनाच्या विचारप्रवाहाला बळ द्यावे" धम्म चर्चेचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निमंत्रक रजनिकांत वाघमारे, प्रविण टाकणखार, युवराज जाधव, मल्हारी जाधव, सूरज निकाळजे, सुशीलकुमार उजगरे, संदिप सोनवणे, विक्रांत उजगरे, धनराज पारवे, आशिष जोगदंड, आकाश कोकाटे, चंदू काळे, वैभव धवन, मयूर कांबळे, प्रताप बनसोडे, अनिकेत वडमारे, सूरज वाघमारे, आदर्श सोनवणे, अमित कोरडे, अभय इंगोले, ऋषी उघडे, सारंग जावळे, मनोज शिंदे, सिध्दार्थ पवळे परिश्रम घेत आहेत.

# महानगरपालिका कर्मचारी अधिकाऱ्यांनी तीन दिवसांमध्ये शहरात सुधारणा करा-जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिका चे आयुक्त संतोष खांडेकर यांच्यावर कारवाईनंतर शासनाचे आदेशावरून जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडे जालना महानगरपालिका चा आयुक्त पदाचा चार्ज देण्यात आला त्यानंतर मा. जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी आज महानगरपालिका मध्ये अधिकारी कर्मचाऱ्यांची बैठक घेण्यात आली. सदरील बैठकीमध्ये संबंधित विभाग व कर्मचाऱ्यांनी तीन दिवसांमध्ये शहरांमध्ये सुधारणा करण्याची सूचना जिल्हाधिकारी तथा आयुक्त महानगरपालिका यांनी केले आहे.

जालना महापालिकातील विविध विभागातील महापालिकेच्या कार्यालयात विविध विभागांची पाहणी केली. या पाहणी दरम्यान त्यांनी स्वच्छता आणि इतर महत्त्वाच्या बाबी बाबत आवश्यक त्या सूचना केल्या. महापालिकेतील अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सर्व सहाय्यक आयुक्त आणि विभाग प्रमुख यांची एक आढावा बैठक आयोजित केली




गेली.

या बैठकीत शहरांमधील विविध प्रश्न तत्काळ मार्गे लावून तीन दिवसांमध्ये अहवाल सादर करा अशा सूचना करण्यात आले.सार्वजनिक बांधकाम विभाग: शहरातील सर्व गटारीच्या ओपन चेंबरवर झाकण किंवा सदरील चेंबर बंद करण्याची तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. तसेच विद्युत विभाग शहरातील रस्त्यात असलेले पोल तात्काळ शिफ्ट करण्याचे निर्देश देण्यात आले .शहर स्वच्छता विभाग भटके कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्याच्या कामास गती देण्यात यावी,तसेच शहरातील विविध रस्त्यांच्या दुभाजकातील कचरा साफ करण्यात यावा. अतिक्रमण विभाग यांनी शहरातील अनाधिकृत फेरीवाले यांचेवर तात्काळ कारवाई करावे नगररचना विभाग यांनी

शहरातील अतिक्रमणांचे सर्वेक्षण करणे आणि त्यावर खुणा करून कारवाई करावे. उद्यान आणि मालमत्ता विभागाने महापालिकेच्या मालकीच्या मोकळ्या जागाची पाहणी करून माहिती घेणे. महापालिकेच्या मोकळ्या जागांवर स्वच्छता करून उद्यान विकसित करण्यासाठी संयुक्त नियोजन करावे कर विभाग कर्मचाऱ्यांनी कर वसुलीच्या संदर्भात मोहिम सुरू करण्याचे अनुषंगाने नियोजन करावे. प्रशासन विभाग विभागाने महापालिकेतील रिक्त जागा भरने बाबत तात्काळ आवश्यक ती नियोजन करावे. घनकचरा प्रकल्प घनकचरा व्यवस्थापन चे फेर ई निविदा प्रक्रिया तात्काळ राबविण्या बाबत निर्देश देण्यात आले. याप्रमाणे सर्व विभागांचा आढावा पुढील तीन दिवसानंतर घेण्यात येणार आहे, ज्यामुळे महापालिकेच्या कार्यप्रणालीत सुधारणा करावे.

# स्ट्रीट लाईट दुरुस्त करताना विजेचा धक्क्याने नगरपरिषद कर्मचाऱ्याचा मृत्यू

परभणी । प्रतिनिधी

मानवत शहरातील पाळोदी रोड भागात स्ट्रीट लाईट दुरुस्ती करताना नगरपालिकेच्या एका कर्मचाऱ्याचा विजेचा धक्का लागून दुर्देवी मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. प्रदीप रामभाऊ सोनटक्के (वय ३९) रा. नगर पालिका वसाहत असे त्या कर्मचाऱ्याचे नाव आहे.



पालिकेचे सफाई विभाग अधिकारी रावसाहेब दगडू झोडपे (रा. वालीबाचा मळा, मानवत) यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रदीप सोनटक्के हे नगर परिषदेच्या स्ट्रीट लाईट विभागात मागील ३५ वर्षांपासून कार्यरत आहेत. सोमवारी सकाळी प्रदीप सोनटक्के, सिद्धांत घुगे, लाखनसिंग जुन्नी व दत्ता उन्हाळे या सहकाऱ्यांसह पथदिवे दुरुस्तीचे काम करण्यास गेले होते. काम सुरू करण्यापूर्वी जुनी रचना कॉलनी डी.पी. बंद करून लाईट दुरुस्तीचे काम सुरू केले होते. पहिल्या दोन पोलवरील काम पूर्ण झाल्यानंतर प्रदीप सोनटक्के तिसऱ्या पोलवर चढून काम करीत असताना त्यांना विजेचा तीव्र धक्का बसला आणि ते खाली पडले. तत्काळ सहकाऱ्यांनी त्यांना एका खाजगी रुग्णालयात , मानवत येथे दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर मृतदेह ग्रामिण रुग्णालय मानवत येथे शवविच्छेदनासाठी हलविण्यात आला. रावसाहेब झोडपे यांनी दिलेल्या खबरीनुसार, ही घटना अपघाती असून कोणावरही संशय नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.यानुसार मानवत पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद घेण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास मानवत पोलीस करीत आहेत. या घटनेमुळे नगर परिषद कर्मचाऱ्यांत हळहळ व्यक्त केली जात आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
बुधवार, दि.२९ ऑक्टोबर २०२५


# लेकीला न्याय मागण्यासाठी आईलाही यावे लागले रस्त्यावर

## रस्ता रोकोसह वडवणी शहर कडकडीत बंद करत सर्वधर्मीय नागरिकांचा आक्रोश

### एसआयटीमार्फत तपास करुन संपदाताईचा बळी घेणाऱ्याला फाशी द्या

वडवणी । प्रतिनिधी

**रक्ताचे पाणी करून ऊस तोडणी करून लेकीला शिकवलं,मोठं केलं. डॉक्टर झालेली लेक आता कुटुंबाची आधार झाली होती. मात्र प्रशासनातील नराधमांनी तिचा छळ करीत बळी घेतला. या नाराधामांना फाशी द्या. अशी आर्त मागणी करण्यासाठी खुद मयत डॉक्टर संपदाच्या आईला एक किलोमीटर पायपीट करीत मोर्चामध्ये सहभागी व्हावं लागलं. काळीज पिळवटून टाकणाऱ्या या दृश्यामुळे उपस्थित हजारो लोकांचं मन गहिवरून गेलं होत. वडवणी तालुक्यातील सर्व जाती-धर्माच्या हजारो लोकांनी एकत्र येत वडवणी शहर कडकडीत बंद केलं आणि शहरातील मुख्य चौकावर रास्ता रोको आंदोलन केलं. हे आंदोलन करताना शासनाच्या निर्दयी प्रशासन व्यवस्थेचा सर्वांनी धिक्कार केला.**

डॉ. संपदा श्रीकिसन मुंडे याच्या संशयास्पद आत्महत्या प्रकरणी सखोल आणि निष्पक्ष तपास स्वतंत्र एसआयटी नेमण्यात यावी मागणीसाठी दि.२८/१०/२०२५ रोजी सर्व पक्ष वडवणी शहर बंद व रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. तसेच संबंधीत पोलिस अधिकारी व जबाबदार अधिकाऱ्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली. डॉ. संपदा श्रीकिसन मुंडे या महाराष्ट्र शासनाच्या सेवेत वैद्यकीय अधिकारी म्हणून फलटण येथे ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयात मागील २ वर्षापासून कार्यरत होत्या. त्या सेवाभावी, कर्तव्यनिष्ठ आणि प्रामाणिक डॉक्टर माणून ओळखल्या जात होत्या. काही पोलिस अधिकारी आणि प्रशासनातील प्रभावशाली व्यक्तीकडुन सतत कामकाजात हस्तक्षेप आणि पोस्टमार्टम रिपोर्ट बदलण्यासाठी त्यांच्यावर दबाव येत होता. यात मानसिक छळही सहन करावा लागला. डॉक्टर संपदाने

दिनांक १९ जुन २०२५ रोजी फलटण उपविभागीय पोलिस अधिकारी यांना त्याबाबत लेखी तक्रार दिली होती, परंतु त्या तक्रारीची कोणीही दखल न घेता, त्यावर कोणतीही कार्यवाही न करता फलटण ग्रामीण पोलिस ठाणे येथे पोलिस निरीक्षक सुनिल महाडीक यांनी डॉक्टर संपदा पान ३ वर





# डॉ.संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची निदर्शने

माजलगाव । प्रतिनिधी

**फलटण येथे कार्यरत असलेल्या डॉक्टर संपदा मुंडे यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या गुन्हेगारांना कठोर शासन करण्यात यावे या मागणीसाठी माजलगावात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दि २८ ऑक्टोबर मंगळवार रोजी सकाळी ११:०० वाजता तीव्र निदर्शने करण्यात आली.**




यावेळी डॉ संपदा मुंडे यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यां आरोपींना कठोर शासन करण्यात यावे त्याचबरोबर पीडित कुटुंबाला आर्थिक मदत करण्यात यावी सदर प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे आणि ताबडतोब यासाठी नेमून गुन्हेगार आहेत का याचा शोध घेण्यात यावा अशा मागण्या करण्यात आल्या.यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव शिवाजी कुरे, कॉम्रेड दत्ता डाके, मुसद्दीक बाबा,अशोक डाके, सय्यद फारूक, कृष्णा सोळंके, संदिपान तेल गड,शेषराव अबुज,चंद्रकांत गाते ,जनक तेलगड, कृष्णा सोळंके, दत्ता घुले, सुभाष डाके यांच्यासह इतरांनी निदर्शनात सहभाग घेतला



# दुर्गेश धसे यांचा आ.सुरेश धस यांच्या हस्ते गौरव

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील तळे पिंपळगावच्या दुर्गेश मुकुंद धसे यांनी सामवेद घनपाठी ही दुर्मिळ पदवी मिळवून पाटोदा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवल्याबद्दल रविवारी वारी दुपारी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते अद्वैतचंद्र या निवासस्थानी गुणगौरव करण्यात आला. पुण्यातील वेदशाळेत सलग दहा वर्षे कठोर प्रशिक्षण घेत त्याने सामवेदाच्या गहन शाखेचा सखोल अभ्यास केला. भारतभर मर्यादित संख्येने मिळणाऱ्या या पदवीमध्ये आता दुर्गेशचे नाव समाविष्ट झाले आहे. पान ३ वर




**बीड : येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. २७ ऑक्टोबर २०२५ रोजी माजी आमदार डॉ. नारायणराव मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली फलटण येथील मेडिकल ऑफिसर डॉ. संपदा मुंडे यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याच्या निषेधार्थ एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. यावेळी महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करून या उपोषणाला पाठिंबा देण्यात आला. यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी डॉ. संपदा मुंडे यांना न्याय देण्याची आग्रही भूमिका मांडून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. यावेळी ॲड. सुभाष राऊत यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते**

# ॲड.प्रकाश कवठेकर यांचा समाजभूषण पुरस्काराने गौरव

पाटोदा । प्रतिनिधी

बीड येथील तेजस ग्रुपचे चेअरमन आणि माजी जिल्हा परिषद सदस्य ड.प्रकाश कवठेकर यांना 'माता सावित्री-फातिमा समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



सामाजिक, शैक्षणिक आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. मुंबईत १९ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या समारंभात आ.मंगेश कुडाळकर आणि इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी उपस्थितांनी त्यांच्या समाजसेवा, शिक्षण, डिजिटल उपक्रम आणि युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या ड.प्रकाश कवठेकर यांना 'माता सावित्री फातिमा समाजभूषण'प्रदान करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. तेजस ग्रुपच्या माध्यमातून ड.कवठेकर यांनी तेजस डिजिटल मार्केटिंग, तेजस इलेक्ट्रिकल अँड सप्लायर्स, तेजस अर्बन कॉपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, तेजस अर्बन मल्टिनिधी, ऑक्सितेज मिनरल वॉटर, राजनंदनी अर्थमूव्हर्स, तेजस इंडस्ट्रीज अशा विविध संस्थांद्वारे शेकडो युवकांना दिशा आणि रोजगार दिला. ड.प्रकाश कवठेकर हे अनेक वर्षांपासून सामाजिक चळवळीत सक्रिय सहभागी आहेत. याच बरोबर त्यांनी राजकारणात आपण दबदबा निर्माण करताना अनेक व्यवसाय उभा करून बेरोजगारांच्या हाताला काम देऊन शेकडो चुली पेटविण्याचे काम दखील केलेले आहे. विविध संस्थांच्या माध्यमातून त्यांनी मोठे नेटवर्क उभा केलेले असून सामाजिक कार्यही त्यांनी जपलेले आहे. अतिवृष्टी आणि दुष्काळाच्या काळात त्यांनी विविध उपक्रम राबवून गरजवंतांना मतदीचा हात देण्याचे कामही केलेले आहे. याच कारणाने त्यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला आहे. या पुरस्कारामुळे त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. या कार्यक्रमास माता सावित्री फातिमा सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष कादर सय्यद सर एफ एम खान डॉक्टर सलीम जावेद वाहक सुनील पाटील सर, तांदळे अभिजित सर,रतन बहिर सर, फसले सर,राहुल शिंदे, गोरख बेद्रे सचिन बेद्रे, दाऊद पठाण आदी.

# चकलांबा पोलिसांची मालेगावात धडाकेबाज कारवाई

## शेतातील गांजाची झाडे; साडेबारा लाखांचा मुद्देमाल जप्त

शिरूर का. । प्रतिनिधी

दिनांक २८/१०/२०२५ रोजी चकलांबा पोलीसांनी गुप्त माहितीद्वारे मालेगाव (बु.) शिवारातील गट क्र. २४८ मधील शेतात लावलेली गांजाची झाडे उखडून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ४२ किलो वजनाचा अंदाजे १२ लाख ५५ हजार रुपयांचा गांजाचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली होती की, श्रीराम बने या व्यक्तीने मालेगाव (बु.) गावाजवळील गट क्रमांक २४८ मधील शेतात गांजाची झाडे लावून त्यांची जोपासना केली आहे. यावरून पोलिसांनी तात्काळ स्टाफसह



घटनास्थळी धाड टाकून खात्री केली असता, गांजासदृश्य काही झाडे आढळून आली.

त्यानंतर नायब तहसीलदार कट्टे व मंडळ अधिकारी यांच्या उपस्थितीत पंचनामा करून सर्व झाडे जप्त करण्यात आली. एकूण ४२ किलो वजनाच्या गांजाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्याची बाजारभावाने किंमत सुमारे १२,५५,००० इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे. ही धडक कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत काँवत , अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलिस उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलीस ठाण्याचे सपोनि संदीप पाटील व त्यांच्या पथकाने केली.

# कडा महेश साखर कारखान्यात भ्रष्टाचाराचा गुंता

## संचालक मंडळ बरखास्त करण्याची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून कारखाना ठप्प ठेवून शेतकरी व कामगारांची दिशाभूल करणाऱ्या कडा (महेश) सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर कठोर कारवाई करून प्रशासकाची नियुक्ती करण्यात यावी, अशी ठाम मागणी आष्टी तालुका साखर कामगार युनियनने निवेदनाद्वारे केली आहे.

या मागणीसाठी युनियनतर्फे ३१ ऑक्टोबर रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत

**३१ ऑक्टोबर रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आष्टी तालुका साखर कामगार युनियनचे धरणे आंदोलन**

धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना आष्टी तहसीलदार मार्फत निवेदन देण्यात आले आहे.

युनियनने आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, महेश मल्टीस्टेट को-ऑप बँकेने कारखान्याच्या ७/१२ उताऱ्यावर टाकलेला बोजा बेकायदेशीर असून, कारखान्याची मालमत्ता बेकायदेशीररीत्या स्वतःच्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यामुळे कारखाना वाचवण्यासाठी तातडीने बोजा कमी करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय थकीत पगार, ग्रॅच्युटी मिळावी, तसेच औद्योगिक न्यायालय औरंगाबाद, उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद, आर.जी.डी. औरंगाबाद, पान ३ वर

# शेतकऱ्यांची लकी ड्रॉ योजना कृषी अधिकाऱ्यांकडून मंजुरीविना पडून

पाटोदा । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना लकी ड्रॉ लागलेले योजना

ची कागदपत्र ची मुदत दहा दिवसाची असते मात्र शासनाकडे आपले कागदपत्र तीन तीन महिन्याच्या चार महिने पडून असतात आमचे योजना वापस जातात लकी ड्रॉ लागून काही उपयोग होत नाही शेतकऱ्यांनाच लकी ड्रॉ लाभला म्हणून शेतकरी खुश होतो पण प्रत्यक्षात त्या योजनेचा शेतकऱ्याला भेटत नाही कृषी ऑफिस मार्फत त्याला मंजुरी देण्यात येत नाही यात कृषी अधिकारी गोड बंगाल करत नाही ना असं शेतकऱ्यांनी येऊ लागला आहे पाटोदा पश्चिम ला कृषी अधिकारीच नाही कृषी विभागामार्फत अनेक योजना शेतकऱ्यांच्या असतात मात्र त्याच्या माहितीचा बोर्ड कुठेही उपलब्ध लावलेला नाही व शेतकरी योजनेपासून शासकीय योजना पासून वंचित राहतात कीटकनाशकाच्या औषधापासून वंचित राहतो शासनामार्फत अनेक योजना शेतकऱ्यांनी येत असतात मात्र कृषी करण्याचे कर्मचारी शेतकऱ्यांच्या योजना हडप करण्याच्या उद्देशाने टपून बसलेले असतात कृषी कार्यालयातील कर्मचारी शेतकऱ्यांच्या योजना हडप करण्याच्या तयारीतच असतात पाटोदा कृषी कार्यालयात लागलेल्या लकी ड्रॉ ची माहिती विचारली असता वडीची उत्तरे देऊन शेतकऱ्यांना वापस पाठवतात लागलेल्या योजनेचा शेतकऱ्यांना लाभ कसा मिळणार पान ३ वर

# डॉक्टर संपदा मुंडे आत्महत्येस कारणीभूत दोषींवर तात्काळ कार्यवाही करा

आय एम चे राज्य पदाधिकारी डॉ.राजेश इंगोले यांची मागणी



अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीडच्या वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील रहिवासी असलेल्या व सध्या फलटण ग्रामीण वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या डॉ संपदा मुंडे यांनी पोलीस प्रशासनातील अधिकारी राजकीय पुढारी व आरोग्य सेवेतील वरिष्ठ अधिकारी यांच्या शारीरिक व मानसिक ज्याच्याच कंटाळून हातावर सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली होती.या प्रकरणाचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटत आहेत. भ्रष्ट प्रशासकीय अधिकारी पोलीस प्रशासन व राजकीय पुढारी यांच्यातील अभद्र युतीमुळे सर्वसामान्य जनतेस व प्रामाणिक अधिकाऱ्यांवर मरण्याची वेळ येत आहे.

याप्रकरणी इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे डॉक्टर संपदा मुंडे यांची आत्महत्या नसून प्रशासनाने केलेली हत्या आहे त्यामुळे डॉ संपदा मुंडे यांच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्यांची एसआयटी चौकशी करा.तसेच हा खटला फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालून संबंधित प्रशासकीय अधिकारी, पोलीस प्रशासन, राजकीय पुढार्यांवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ राजेश इंगोले यांनी उपजिल्हाधिकारी कार्यालयात केली आहे.

घडलेल्या प्रकारामुळे कार्यतत्पर वैद्यकीय अधिकारी यांचे मानसिक खच्चीकरण झालेले असून सरकारने बघ्याची भूमिका न घेता दूषी असलेल्या या नराधमांवर त्वरित कायदेशीर कार्यवाही करावी व दोषींना शासन द्यावे अशी मागणी एका निवेदनाद्वारे पान ३ वर

# नदीपात्रात करावे लागतात अंत्यसंस्कार

## वटणवाडी येथील स्मशानभूमीबाबत ठोस निर्णय नाही

आष्टी । शरद रेडेकर

तालुक्यातील वटणवाडी येथे स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध असताना एका इसमाच्या आडमुठेपणा मुळे अंत्यसंस्कारा साठी अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत त्यामुळेच

नदीपात्रात अत्यंत थोड्या जागेत अंत्यसंस्कार पार पाडावे लागत आहेत याबाबत मध्यंतरी झालेल्या बैठकीमध्ये तहसीलदार आणि ग्रामस्थ यांच्यामध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध होईल असे ठरले होते परंतु तहसीलदार आष्टी यांचे याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे याबाबत अधिक माहिती अशी की, वटणवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते गोपीनाथ नरवडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमी नसल्यामुळे नदीपात्रात उरलेल्या थोड्याशा जागेत त्यांच्या अंत्यसंस्कार उरकण्यात आला मध्यंतरी झालेल्या मोठ्या पर्जन्यवृष्टीमुळे नदीपात्राच्या कडेने देखील जमिनी वाहून गेलेल्या आहेत आणि गावातील



एका इसमाच्या विरोधामुळे स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध होत नाही त्यामुळे वटनवाडी येथील ग्रामस्थ संतप्त झालेले आहेत याबाबत मध्यंतरी बाळू शिरोळे नावाच्या इसमाचा मृत्यू झाल्यानंतर पाच तास अंत्यविधी रखडला गेला होता त्यावेळी तहसीलदार आष्टी आणि ग्रामस्थ यांच्यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सामंजस्य बैठक पार पडली त्यामध्ये लवकरच स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देऊ असे आश्वासन तहसीलदार आष्टी यांनी दिले होते परंतु अजूनही यावर ठोस उपाय योजना झालेली नाही मध्यंतरी पाऊस न झाल्यामुळे नदीपात्रात थोडी जागा शिल्लक राहिली असल्यामुळे अंत्यसंस्कार करता आला परंतु जास्त पाणी आले असते तर अंत्यसंस्काराचा मोठा प्रश्न निर्माण झाला असता प्रस्तुत प्रतिनिधीने याबाबत तहसीलदार आष्टी यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी फोनवर उत्तर दिले नाही आणि मेसेज चा रिप्लाय दिला नाही यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली असून वटणवाडी येथील स्मशानभूमीचा प्रश्न लवकरच मार्गी लागला नाही तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मतदानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय जाहीर करून तसे निवेदन ग्रामस्थ लवकरच तहसीलदार आष्टी जिल्हाधिकारी बीड यांना देणार आहेत.या स्मशानभूमीच्या प्रश्नावर लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची मागणी होत आहे

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनधिकृत फ्लेक्सवर तात्काळ कारवाई करा-आयुक्त श्रावण हर्डीकर

## निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकाऱ्यांची पार पडली बैठक



**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनधिकृत फ्लेक्सवर तात्काळ कारवाई करा. यासाठी गरज पडल्यास पोलिसांची मदत घ्या. शहरात अनधिकृत फ्लेक्स आढळल्यास ते तात्काळ हटवावेत, असे निर्देश आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले. सर्व प्रभाग स्तरावर क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी यासाठी स्वतंत्र पथक नेमावे आणि त्या माध्यमातून कारवाई करण्याची मोहीम सातत्याने राबवावी, अशा स्पष्ट सूचना आयुक्त हर्डीकर यांनी दिल्या आहेत.

महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने नोडल अधिकाऱ्यांची विविध कामकाजासाठी नेमणूक करण्यात आली आहे. या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात आयुक्त हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. आयुक्त हर्डीकर हे दृकश्राव्य माध्यमातून बैठकीत सहभागी झाले होते. निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी बैठकीच्या सुरुवातीला निवडणूक कामकाजाबाबत सविस्तर माहिती दिली.

अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, नगर सचिव मुकेश कोळप, सह शहर अभियंता बापू गायकवाड, अनिल भालसाखळे, मनोज सेठिया, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, राजेश आगळे, सीताराम बहुरे, प्रदीप खोत, निलेश भदाणे, पंकज पाटील, सहाय्यक आयुक्त राजू घुले, उमेश ढाकणे, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित, अजिंक्य येळे, सहाय्यक संचालक नगररचना प्रशांत शिंपी, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह निवडणूक कामकाजात सहभागी अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

निवडणूक कामकाज प्रशिक्षण, मतदान केंद्र, ईव्हीएम व्यवस्थापन, वाहन अधिग्रहण, जनसंपर्क व प्रसिद्धी, स्विप व्यवस्थापन, निवडणूक खर्च व्यवस्थापन, न्याय व विधी कक्ष, संगणकीय कामकाज आदी निवडणूक कामकाजासंबंधी सर्व बाबींचा आयुक्त हर्डीकर यांनी आढावा घेऊन आवश्यक तरतूद ठेवण्याच्या सूचना दिल्या. तसेच मतदार प्रक्रियेच्या अनुषंगाने तात्काळ करावयाच्या उपाययोजना व कार्यवाही याबाबत संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करून सोपवलेली जबाबदारी विहित वेळेत चोखपणे पार पाडावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

## ३० ऑक्टोबर रोजी पिंपरी चिंचवड शहरातील विविध भागातील पाणीपुरवठा राहणार बंद

**पिंपरी । प्रतिनिधी**

निगडी भक्ती शक्ती चौकात मेट्रोचे काम सुरू असून, या कामासाठी सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रातून नेहरूनगरकडे जाणारी मुख्य जलवाहिनी स्थलांतरित (शिफ्ट) करावी लागणार आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने हे काम ३० ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात येणार आहे.



जलवाहिनी स्थलांतरित करण्याच्या कामासाठी, सदर जलवाहिनीवरून पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या नेहरूनगर, संत तुकारामनगर, महेशनगर, गंगानगर, वल्लभनगर, कासारवाडी, फुगेवाडी तसेच चिखली येथील हरगुडे वस्ती, पवार वस्ती, कुदळवाडी, जाधववाडी इत्यादी भागातील ३० ऑक्टोबर रोजी संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच शुक्रवार (३१ ऑक्टोबर २०२५) रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल.नागरिकांनी पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवावा आणि पाणी काटकसरीने वापरून मनपाला सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिचवड महापालिकेचया पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

निगडी परिसरातील मेट्रो कामाशी संबंधित जलवाहिनी स्थलांतरित करण्याचे काम तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाचे असून, ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांना होणारा तात्पुरता गैरसोय टाळण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करीत आहोत. तरी नागरिकांनी सहकार्य करावे.

## वारंवार दिसतोय बिबट्या! रांजणगाव परिसरात नागरिकांच्या मदतीने वनविभागाकडून पिंजरा तैनात



**रांजणगाव । प्रतिनिधी**

गाव परिसरात वाढत्या वन्यप्राण्यांच्या हालचालीमुळे सुरक्षेच्या दृष्टीने बिबट्यांना पकडण्यासाठी पिंजरा बसविण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी सातत्याने पाठपुरावा करून वन विभागाकडे केली होती. मागील पाच-सहा दिवसांपासून गावातील नागरिकांना वाड्या-वस्त्यांवर रात्रीच्या वेळी बिबट्यांचे वारंवार दर्शन होत असल्याने हा निर्णय घेण्यात आला.या कामासाठी उठाबा गटाचे युवा सेना जिल्हा प्रमुख संदीप शिंदे, नामदेवराव पाचुंदकर पाटील, नवनाथ आढाव, अनिकेत बांदल, आणि राजू फंड यांनी पुढाकार घेतला.

वनविभागाने उपलब्ध करून दिलेले पिंजरे खाजगी वाहनांच्या माध्यमातून रांजणगाव येथील वाड्यावस्त्यांवरती लावणे व पिंजऱ्यांमध्ये बिबट्यासाठी शिकार ठेवण्याचे काम स्थानिक नागरिकांनी केल्यामुळे, ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. कारण मागील पाच-सहा दिवसापासून गावातील नागरिकांना वाड्या-वस्त्यांवर रात्रीचा प्रवास करताना अनेक वेळा बिबट्यांचे दर्शन झाले होते. या उपक्रमात शिरूरचे वनरक्षक निलकंठ गव्हाणे, वनरक्षक सविता चव्हाण आणि वनसेवक जयेश टेमकर यांनी विशेष सहकार्य केले. स्थानिक ग्रामस्थांनी वन अधिकाऱ्यांचे आभार मानत, त्यांच्या तत्पर आणि जबाबदार कामगिरीचे कौतुक केले.गावकऱ्यांनी अशा उपक्रमांमुळे मानव-वन्यजीव संघर्ष कमी होऊन सुरक्षिततेची भावना निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले.

## पूर्वीच्या वादातून तरुणावर प्राणघातक हल्ला; एक अटक, सहा जणांविरुद्ध गुन्हा

***पुणे । प्रतिनिधी***

पूर्वीच्या वादातून सहा ते सात जणांच्या टोळक्याने लोखंडी हत्यार आणि लाकडी काठ्याने मारहाण करत एकाच्या खुनाचा प्रयत्न केला. मारहाणीत तरुणाचा भाऊ देखील जखमी झाला आहे. हुसेन मुस्तफा कादरी (वय २७) आणि त्याचा भाऊ शब्बीर कादरी (रा. हांडेवाडी रोड) अशी जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत.

याप्रकरणी काळेपडळ पोलिसांनी हुसेन कादरी याने दिलेल्या फिर्यादीनुसार, अमजद अफजल शेख (वय ४५) याला अटक केली आहे. तर अकबर अफजल शेख (वय ४०), आयान अमजद शेख (वय २२), मदत्सर सलीम शेख (वय २८), मजहर काजी (वय २८), अशपाक अफजल शेख (वय २८), जावेद बागवान व इतर अनोळखी (सर्व रा. सैय्यदनगर, महंदवाडी) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार रविवारी (दि. २६) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास सैय्यदनगर गल्ली क्रमांक ०७ महंमदवाडीत घडला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा भाऊ शब्बीर आणि आरोपींचा काही दिवसापूर्वी वाद झाला होता. त्याच कारणातून रविवारी रात्री आरोपींनी संगनमत करून गैरकायद्याची मंडळी एकत्र करून शब्बीर याला फळाच्या गोडाऊनमध्ये जाऊन लोखंडी हत्यार आणि लाकडी काठ्याने बेदम मारहाण केली आहे. मारहाणीत फिर्यादी हुसेन हे देखील जखमी झाले आहेत. दरम्यान, हा प्रकार घडल्यानंतर हुसनने यांनी काळेपडळ पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी टोळक्याच्या विरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून अमजद शेख याला अटक केली आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक विशाल सुतार करत आहेत.

## छत्रपती साखर कारखान्यात घोटाळा? गोडाऊनमधून ३४ हजार साखर पोती गायब, शिवसेनेची चौकशीची मागणी

**भवानीनगर । प्रतिनिधी**

श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना भवानीनगर (ता. इंदापूर) या साखर कारखान्यातील साखर गोडाऊन मधील ३४ हजार साखरेच्या पिशव्यांचा अपहार झाला असल्याचे दिसून येत असल्याने याबाबत सखोल चौकशी करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन शिवसेना पुणे जिल्हा प्रमुख बाळासाहेब शिंदे यांनी कारखान्याचे कार्यकारी संचालक यांना दिले आहे.



विशाल निंबाळकर, दत्तात्रय ढवाण, राजाराम काटे, सतीश काटे, विजय शिरसट, गणेश गुप्ते, दादासो दळवी, यांच्या उपस्थितीमध्ये श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अशोक जाधव यांच्याकडे हे निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना पुणे उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब यांनी या निवेदनाद्वारे मागणी केली आहे की श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना भवानीनगर गोडाऊन मधील साखर साठ्यातील ३४ हजार पिशव्या कमी दिसून येत आहेत. जनरल मिटींगच्या(सभेच्या) ठरावाप्रमाणे साखर कारखान्याने चौकशी करून कारवाई केली आहे का किंवा चौकशी झाली असेल तर त्याचा अहवाल सादर करून त्यावर काय कार्यवाही करणार आहात. व याबाबतची सर्व माहिती सभासदांना मिळावी हि विनंती करण्यात आली. विहित मुदतीत सदर चौकशी झाली नाही अहवाल सादर झाला नाही तर आम्ही सभासदांची जनजागृती करून तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला

## जनसंवाद सभेसाठी नागरी सुविधा केंद्राचे विभागप्रमुख यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रात होणाऱ्या जनसंवाद सभांसाठी नागरी सुविधा केंद्राचे विभागप्रमुख यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या या विभागाचे प्रमुख म्हणून डॉ. प्रदीप ठेंगल हे जबाबदारी पाहत आहेत.

महापालिकेच्या कार्यक्षेत्रात मंत्री, खासदार, आमदार, पदाधिकारी तसेच क्षेत्रीय कार्यालय यांच्या मार्फत वेळोवेळी जनसंवाद सभा आयोजित केल्या जातात. या सभांदरम्यान नागरिकांच्या अडचणी, मागण्या व सूचना प्रभावीपणे नोंदविणे, त्यांचे संकलन करणे आणि आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करणे या दृष्टीने समन्वय राखला जावा, तसेच नागरिकांच्या सोयीकरिता माहितीचे संकलन एका ठिकाणी व्हावे आणि विविध विभागांमधील समन्वय सुलभतेने व्हावा, या उद्देशाने प्रत्येक जनसंवाद सभेसाठी नागरी सुविधा केंद्राचे विभागप्रमुख डॉ.प्रदीप ठेंगल यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे, असे देखील आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## महापालिका निवडणूक आरक्षण सोडतीचा मुहूर्त ठरला ; 'या' तारखेला होणार फैसला

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीसाठीची प्रभाग रचना अंतीम झाल्यानंतर तिकिटासाठी तीव्र चढाओढ असलेल्या इच्छुकांचे प्रभागाच्या आरक्षणाकडे लक्ष लागले आहे. या आरक्षण सोडतीची तारीख अखेर जाहीर झाली असून आता ११ नोव्हेंबर २०२५ रोजी ही सोडत काढली जाणार आहे.महापालिकेच्या स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे ही सोडत काढली जाणार आहे. त्यासाठीचे वेळापत्रक राज्य निवडणूक आयोगाने सोमवारी जाहीर केले. या सोडतीमुळे इच्छुकांना आपल्याला उमेदवारी मिळणार की दुसऱ्या प्रभागात लढावे लागणार हे स्पष्ट होणार आहे.

महापालिकेची अंतीम प्रभाग रचना ४ ऑक्टोबर रोजी जाहीर झाली. त्यानंतर आरक्षण सोडत निघणे अपेक्षित होते. मात्र, निवडणूक आयोगाकडून आरक्षण सोडतीच्या आधीच प्रभाग निहाय आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी अंतीम करण्याचे वेळापत्रक जाहीर केले गेले. त्यानुसार, प्रशासनाकडून ते काम सुरू असतानाच आता प्रभाग निहाय आरक्षणाच्या सोडतीचे वेळापत्रक जाहीर झाले. यामुळे निवडणूक प्रक्रियेला आणखी वेग येणार आहे. या वेळापत्रकानुसार ही प्रक्रिया ३० ऑक्टोबर



ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत पूर्ण केली जाणार आहे.

त्यात अनुसूचित जाती, जमाती आणि नागरिकांचा इतर मागासवर्गीय प्रवर्ग (ओबीसी) प्रभाग निश्चित केले जाणार आहे. आरक्षणाच्या सोडतीनंतर कोण कोणत्या प्रभागातून निवडणूक लढवणार?, घरातील पुरुष निवडणूक लढवणार की महिला निवडणूक लढवणार? हे चित्र स्पष्ट होते. त्यामुळे ही सोडत इच्छुक उमेदवारांसाठी सर्वात महत्वाची समजली जाते. या शिवाय, हे आरक्षण कसे निश्चित करावे यासाठी शासनाकडून गेल्या आठवड्यात महापालिकेसाठी नियमावली जाहीर केली आहे.

असे आहे वेळापत्रक

-आरक्षित जागांची संख्या निश्चित करून त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्यास प्रस्ताव सादर करणे - ३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर - आरक्षण सोडतीची सूचना जाहीर करणे - ८ नोव्हेंबर - आरक्षण सोडत काढून सोडतीचा निकाल राज्य निवडणूक आयोगास सादर करणे - ११ नोव्हेंबर - प्रारूप आरक्षण हरकती व सूचनांसाठी जाहीर करणे - १७ नोव्हेंबर - हरकती सूचना मागविण्याचा अंतिम दिनांक - २४ नोव्हेंबर - हरकती-सूचनांवर विचार करून पालिका आयुक्तांनी निर्णय घेणे - २५ नोव्हेंबर ते १ डिसेंबर - आयोगाच्या मान्यतेनंतर अंतिम आरक्षण राजपत्रात जाहीर करणे - २ डिसेंबर २०२५

## पुण्यात दोन वेगवेगळे अपघात : ज्येष्ठ नागरिक आणि पादचारी ठार!

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात वेगवेगळ्या अपघातात एका ज्येष्ठ नागरिकासह आणखी एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. सिंहगड रस्त्यावरील धायरी, तसेच अहिल्यानगर रोडवरील लोणीकंद भागात अपघाताच्या घटना घडल्या. या प्रकरणी, स्थानिक पोलिस ठाण्यात गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. (डरींशीीं झीपश छ्शुी)

धायरीतील डीएसके विश्व रस्त्यावर टेम्पोच्या धडकेत ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेश गणपत लांडगे (वय ७३, रा. केंद्रे कॉम्प्लेक्स, काका चव्हाण शाळेसमोर, धायरी) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. याप्रकरणी टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत लांडगे यांच्या मुलीने नांदेड सिटी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लांडगे हे ३० सप्टेंबर रोजी दुपारी बाराच्या रस्त्यावरील डीएसके विश्व सोसायटी रस्त्यावर असलेल्या गणपती मंदिर परिसरात बागकाम करत होते. त्यावेळी भरधाव टेम्पोने रस्त्याच्या कडेला थांबलेल्या लांडगे यांना धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या लांडगे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. या प्रकरणी पोलिस कर्मचारी एस. के. भापकर तपास करत आहेत.तर नगर रस्त्यावरील लोणीकंद भागात रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्याचा भरधाव मोटारीच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना २२ ऑक्टोबर रोजी दुपारी चारच्या सुमारास घडली. तोयाबहाद्दुर किनबहाद्दुर थापा (वय ४८, सध्या रा. लोणीकंद) असे मृत्युमुखी पडलेल्या पादचाऱ्याचे नाव आहे. थापा हे हॉटेल कामगार आहेत. २२ ऑक्टोबर रोजी दुपारी चारच्या सुमारास थापा लोणीकंद परिसरातून निघाले होते. दुपारी चारच्या सुमारास चंद्रमा हॉटेलसमोर रस्ता ओलांडणाऱ्या थापा यांना भरधाव मोटारीने धडक दिली.

## रवींद्र धंगेकरांना पुणे कोर्टाचे समन्स; 'या' दिवशी हजर राहण्याचे दिले आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कोथरुड परिसरात निलेश घायवळ गँगप्रकरणाने राजकीय वादाला नवे वळण मिळाले आहे. भाजप नेते आणि माजी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शिवसेना (शिंदे गट) नेते तथा माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी गंभीर आरोप केले होते. धंगेकर यांनी दावा केला होता की, निलेश घायवळ आणि चंद्रकांत पाटील यांच्यात निकटवर्तीय संबंध असून, पाटील यांच्या पाठबळामुळेच घायवळ गँग पुण्यात दहशत माजवत आहे. याच प्रकरणात चंद्रकांत पाटील यांचे निकटवर्तीय समीर पाटील यांच्यावरही धंगेकर यांनी गुन्हेगारी कारवायांचा आरोप केला होता.

या आरोप-प्रत्यारोपांच्या फैलावामुळे समीर पाटील आणि धंगेकर यांच्यातील वाद कोर्टात पोहोचला असून, पुणे जिल्हा सत्र न्यायालयाने धंगेकर यांना समन्स बजावले आहे. आजपासून या मानहानीच्या खटल्याची सुनावणी सुरू झाली असून, पुढील सुनावणी ७ नोव्हेंबरला होईल. कोर्टाने धंगेकर यांना त्या तारखेला हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. पुण्यातील कोथरुडमधील निलेश घायवळ हा कुख्यात गुंड आहे, जो अलीकडे विदेशात पसार झाला होता. घायवळवर अनेक गुन्हे दाखल असून, त्याच्या पासपोर्टबाबत जोरदार चर्चा सुरू झाली होती. अखेर, केंद्रीय गृह मंत्रालयाने त्याचा पासपोर्ट रद्द केला असून, पुणे पोलिसांनी युनायटेड किंगडमच्या हाय कमिशनला पत्र पाठवून त्याच्या अटकेची विनंती केली आहे. या पार्श्वभूमीवर रविंद्र धंगेकर यांनी राजकीय नेत्यांवर थेट हल्लाबोल केला होता.



धंगेकर यांनी माजी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर गुन्हेगारी कारवायांना आश्रय देण्याचा आरोप केला होता. त्यांनी समीर पाटील यांचा घायवळसोबतचा फोटो पुढे करत दावा केला की, समीर पाटील कोथरुडमधील गुंडगिरीला चालना देत आहेत आणि घायवळसारख्या गुंडांना संरक्षण देत आहेत. या आरोपांनी राजकीय वातावरण तापले असताना, समीर पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन प्रत्युत्तर दिले. पाटील यांनी म्हटले की, निलेश घायवळ याच्यासमवेत माझी ओळख आहे, पण तो माझा मित्र किंवा सहकारी नाही. धंगेकर यांचे आरोप पूर्णपणे खोटे आणि खोटी प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. या प्रत्युत्तरासोबतच, समीर पाटील यांनी धंगेकर यांच्याविरुद्ध पुणे जिल्हा सत्र न्यायालयात मानहानीचा (डिफेमेशन) दावा दाखल केला होता. या दाव्यात पाटील यांनी धंगेकर यांच्या विधानांमुळे त्यांच्या प्रतिमेला धक्का बसल्याचा आणि व्यावसायिक नुकसान झाल्याचा उल्लेख केला आहे.

या मानहानीच्या खटल्यात आजपासून पुणे जिल्हा सत्र न्यायालयात सुनावणी सुरू झाली आहे. न्यायालयाने रविंद्र धंगेकर यांना समन्स जारी करून सुनावणीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. धंगेकर यांच्या अनुपस्थितीतही प्राथमिक सुनावणी झाली असून, कोर्टाने पुढील सुनावणीसाठी ७ नोव्हेंबरची तारीख निश्चित केली आहे. या तारखेला धंगेकर यांना अनिवार्य हजर राहावे लागेल, अन्यथा गुन्हेगारी कारवाई होण्याची शक्यता आहे.

धंगेकर यांनी कोर्टाच्या या निर्णयावर प्रतिक्रिया देत म्हटले की, जैन बोर्डिंग प्रकरणानंतर आता निलेश घायवळ गँगप्रकरणातून मी माझा लढा कायम ठेवणार आहे. हे आरोप खरे आहेत आणि मी कोर्टात सत्य उघड करेन. दुसरीकडे, समीर पाटील यांनी म्हटले की, हे प्रकरण केवळ मानहानीचे नाही, तर राजकीय द्वेषाचे आहे. मी पुराव्यांसह कोर्टात सादर होईन. या खटल्याची पुढील सुनावणी ७ नोव्हेंबरला होणार असून, त्या तारखेला धंगेकर यांची उपस्थिती महत्वाची ठरेल. निलेश घायवळच्या प्रत्यार्पणाची प्रक्रिया सुरू असताना, हे प्रकरण पुण्यातील गुंडगिरी आणि राजकीय नेत्यांच्या कथित संगनमतावर प्रकाश टाकत आहे. पोलीस आणि केंद्रीय यंत्रणांकडून घायवळच्या शोधाचे प्रयत्न तीव्र करण्यात आले आहेत.

## नीरेत जैन बांधवांचा मूक मोर्चा ; व्यवहार रद्द करून सातबारा दुरुस्त करण्याची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील जैन समाजाच्या एचएनडी (जैन) वसतिगृहाच्या विक्री प्रकरणाविरोधात राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर सोमवारी नीरा येथे जैन बांधवांनी शांततामय पद्धतीने मूक मोर्चा काढून या व्यवहाराचा निषेध नोंदवला. या मोर्चातून विक्री व्यवहार तात्काळ रद्द करून सातबार्यावरून गोखले कन्स्ट्रक्शनचे नाव हटवावे, अशी मागणी करण्यात आली.जैन बांधवांनी आज सोमवारी सकाळी निरेतील जैन मंदिरातून मूक मोर्चाला सुरुवात केली. हा मोर्चा बुवासाहेब चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पोलीस स्टेशन, छत्रपती शिवाजी चौक, ग्रामपंचायत कार्यालय असा मार्गक्रमण करून पुन्हा जैन मंदिरात संपन्न झाला. मोर्चात शेकडो जैन बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग होता. संपूर्ण मोर्चा शांततेच्या मार्गाने पार पडला.यावेळी नीरा पोलीस दूरक्षेत्राचे प्रभारी पोलिस उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी यांना मोर्चेकर्यांनी



निवेदन दिले. तसेच ग्रामपंचायतीत उपसरपंच राजेश काकडे यांच्याकडेही निवेदन सादर करण्यात आले. या मोर्चात शांतिकुमार कोठडिया, मनोज शहा, पद्मराज कोठाडिया, रेणुका कोठाडिया, शैला शहा, नवेंदू शहा, सोज्वल शहा, अतुल होरा, कुणाल शहा, सुदर्शन जैन, सुधीर शहा, वर्धमान शहा, नीरज शहा, शांती शेठ शहा, अधिराज कोठाडिया, नेहा शहा, पल्लवी व्होरा, दीपा शहा, रूपाली शहा, अनुजा शहा, निकिता शहा, पल्लवी व्होरा यांसह मोठ्या संख्येने जैन समाजबांधव उपस्थित होते.पुण्यातील जैन वस्तीगृहाची जागा ही जैन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी राहण्याची सोय व्हावी म्हणून दान करण्यात आली होती. ती भूमी विक्रीसाठी वापरणे हा दानधर्माचा अपमान असल्याची भावना आंदोलनात व्यक्त करण्यात आली. या ठिकाणी जैन मंदिर अस्तित्वात असूनही धर्मादाय आयुक्तांना या व्यवहाराची माहिती नसणे आश्चर्यकारक आहे, अशी प्रतिक्रिया जैन बांधवांनी दिली. राजू शेट्टी यांच्या वसतीगृह संदर्भातील आंदोलनाला या मूक मोर्चातून जैन बांधवांनी पाठिंबा दर्शविला. जोपर्यंत सातबार्यावरून गोखले कन्स्ट्रक्शनचे नाव हटत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.